# प्रकरण तिसरे

# शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबरीतील व्यक्तिरेखा

---


१. शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबरीतील व्यक्तिरेखा

- १.१ राम
- १.२ प्रा. कांबळे
- १.३ सावंत
- १.४ रोहिदास नागदिवे
- १.५ मिलिंद
- १.६ गौतम गांगुर्डे
- १.७ विजय पगारे
- १.८ प्रा. राहूल बनसोडे
- १.९ तात्या कांबळे
- १.१० कबीर कांबळे

२. शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा

- २.१ सारजा
- २.२ सुमी
- २.३ जयश्री
- २.४ नंदा गायकवाड
- २.५ विनया प्रधान
- २.६ रमा बाबर
- २.७ सोनल
- २.८ द्रोपदी
- २.९ सविता कांबळे

**समारोप**

## प्रकरण तिसरे

# शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबरीतील व्यक्तिरेखा

---

**प्रास्ताविक :**

या प्रकरणामध्ये आपण शरणकुमार लिंबाळे यांच्या 'भिन्नलिंगी', 'उपल्या' व 'हिंदू' या कादंबऱ्यांमधील व्यक्तिरेखांचा अभ्यास करणार आहोत. कादंबरी या वाङ्मयप्रकरात व्यक्तिरेखांना खूप महत्त्वाचे स्थान आहे. वास्तविक कादंबरी व नाटक हे दोन्ही कथानकप्रधान वाङ्मयप्रकार आहेत. त्यामुळे कथानकाला महत्त्व द्यायचे की व्यक्तिरेखांना महत्त्व द्यायचे याबाबत समीक्षकांमध्ये मतमतांतरे आहेत. कारण कथानक आणि व्यक्तिरेखा हे दोन्ही परस्परावलंबी आहेत. काही वेळेला कथानकातील विशिष्ट घटनांमुळे पात्राचे मनोधर्म तयार होतात तर काही वेळेला पात्रांच्या विशिष्ट मनोधर्मामुळे कथानक घडताना दिसून येते. त्यामुळे व्यक्तिरेखा किंवा कथानक यांपैकी कोणत्या घटकाला महत्त्व द्यायचे हे त्या लेखकाच्या स्वभावानुसार आणि उद्दिष्टानुसार ठरत असते.

वरील विवेचनाच्या दृष्टिकोनातून पाहताना 'भिन्नलिंगी', 'उपल्या' व 'हिंदू' या तीनही कादंबऱ्यांमध्ये पात्रांच्या जीवनात घडणाऱ्या घटनांमुळेच त्यांचे स्वभावधर्म बदलताना दिसून येतात. या कादंबऱ्यातील पात्रे ही प्रामुख्याने दलित चळवळीचे नेतृत्व करणारी आहेत. त्यामुळे त्यांच्या जीवनात समाजपरिवर्तनामुळे व समाजातील विविध घटनांमुळे संघर्ष निर्माण झालेला जाणवतो. सामाजिक जीवनातील घटना पात्रांचे स्वभावधर्म घडवितात आणि परिवर्तन घडवून आणतात. त्यामुळे संघर्षपूर्ण जीवन हा या कादंबऱ्यांमधील पात्रसृष्टीच्या चित्रणामधील महत्त्वाचा विशेष दिसून येतो. या अनुषंगाने शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबरीतील व्यक्तिरेखा अभ्यासता येतील.

**१. शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबरीतील व्यक्तिरेखा :**

शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबरीमधील व्यक्तिरेखा पाहताना 'भिन्नलिंगी' कादंबरीत 'राम' ही प्रमुख व्यक्तिरेखा दिसून येते. या कादंबरीतील 'परपुरूष' या दुसऱ्या विभागात चळवळीपासून दुरावलेल्या कार्यकर्त्यांचे आत्मचिंतन

मांडलेले आहे. 'राम' या प्रमुख व्यक्तिरेखेसोबत 'सावंत', 'प्रा.कांबळे', 'चेल्या', 'सारजा' अशा इतरही व्यक्तिरेखा पहावयास मिळतात. या कादंबरीत एकूण ५५ व्यक्तिरेखा आहेत. आपणास चळवळीविषयक प्रमुख व्यक्तिरेखांचाच विचार याठिकाणी करावयाचा आहे.

'उपल्या' या कादंबरीत लेखकाने चळवळीचा प्रवास मांडलेला आहे. त्यामुळे कादंबरीच्या फॉर्मप्रमाणे कथानक दिसून येत नाही. या कादंबरीत एकच असा नायक नाही तर रोहिदास, गौतम गांगुर्डे, मिलिंद, विजय पगारे, प्रा.राहूल बनसोडे, भीमा भोळे इत्यादीसह एकूण ६७ व्यक्तिरेखा दिसून येतात.

'हिंदू' कादंबरीतही आपणाला एकच नायक दिसून येत नाही, तर 'तात्या कांबळे' या चळवळीतील कार्यकर्त्यांचा अचलपूर गावातील हिंदू धर्माभिमानी खून करतात. या खुन्यांना शिक्षा करण्यासाठी चळवळीची धडपड व सवर्णांनी राजकरणात दलितांचा वापर करून चळवळीची केलेली हानी हे या कादंबरीत दिसून येते. या कादंबरीत तात्या कांबळे, रोहित, सोनाली, प्रा.बनसोडे, कबीर कांबळे अशा व्यक्तिरेखांसह इतर एकूण ८७ व्यक्तिरेखा दिसून येतो.

'उपल्या' व 'हिंदू' या दोन्ही कादंबऱ्या एकाच विषयावर आधारलेल्या जाणवतात. दलित चळवळीच्या प्रवासाचा दोन विभागात आढावा घेणाऱ्या या कादंबऱ्या आहेत. 'उपल्या' कादंबरीत कॉलेजमधील युवकांमधून चळवळीची सुरूवात आणि चळवळीचा राजकीय प्रवास चित्रित झाला आहे. यामध्ये शहरी विभागातील चळवळ दिसून येते. 'हिंदू' कादंबरीत गावापातळीवरील चळवळीची कशी अवस्था आहे याचे चित्रण येते. या दोन्ही कादंबरीतील पात्रे एकसारखी आहेत. 'उपल्या' कादंबरीतील पात्रेच संदर्भानुसार 'हिंदू' कादंबरीत आलेली दिसतात. त्यामुळे 'हिंदू' मधील कथानक उपल्याचाच पुढील भाग असल्याचा आभास होतो. त्यामुळे आपण व्यक्तिरेखेनुसार त्यांचा अभ्यास करणार आहोत.

**१.१ राम :**

'भिन्नलिंगी' कादंबरीतील 'राम' ही प्रमुख व्यक्तिरेखा आहे. 'राम' बी.ए. शिकलेला एक सुशिक्षित बेकार युवक आहे. तो शहरातील दलित पँथरचा

प्रमुख कार्यकर्ता आहे. आपला सर्व वेळ तो डॉ.बाबासाहेबांच्या विचारावरील चळवळीसाठी खर्च करतो. त्याच्या कार्यामुळे दलित पँथरचे 'खजिनदार' हे पद त्याला मिळते. त्याची आई 'सारजा' ही अल्सरची पेशंट आहे. अल्सरमुळे वारंवार तिचे पोट दुखते तरीही आपल्या मुलांसाठी वैरणीचा भारा विकून, लोकांच्या घरी काम करून ती रामला वाढवते. रामच्या मनात फक्त दलित पँथरचे विचार असतात. त्याच्याविषयी निवेदक म्हणतो, "राम बगा, गेलं सालीच बी.य.झालाय.बियाला आलेला पोरगाय. लग्नाचं वय टळून चाललय, पर अजुन त्येला लगीन कराचय न्हैं म्हणतुया... सारजाचा एकूलता एक ल्योक. दाल्ला मेल्यामागं पोरालाच जीवाचा नवरा समजून, सारजानं उभी हयात रंडकंपनात घालविली. आता सारजाबी ठकत चालल्याय. पोरग हाताला आलय. डोन घास तिला कमवून घालायचं, सुनंच्या हातचं सुख देयाचं सोडून राम महाराच्या नादीला लागल्ता.हये दलित पँथर बिंथर म्हणत्येत त्योवच्या."[१]

'राम' हा पँथरमध्ये कोणतीही लालसा न बाळगता काम करतो. सुमीवर बलात्कार होतो, त्यावेळी बलात्काऱ्याला शिक्षा होण्यासाठी मोर्चा काढतो. 'अण्णा भाऊ साठे' नगरामध्ये रामचा प्रभाव अधिक असतो. तेथील तरूण मुले रामला घाबरतात. राम या नगरातील अडचणी सोडविण्यासाठी सतत पुढाकार घेत असतो. त्यामुळे कोणतीही समस्या सर्वजण रामला सांगत असतात. राम पँथरच्या मुलांना सोबत घेऊन अडचणी सोडविताना दिसतो. महारांच्या नादाला लागून पँथरमध्ये जावू नको अशी आई त्याला वारंवार सांगत असते. रामच्या वडिलांचा मृत्यू महारांमुळेच झाला आहे, अशी तिची समजूत असते. पण राम तिचे ऐकत नाही. तो चळवळीत काम करीतच राहतो.

रामकडे चळवळीचे नेतृत्व करण्याची क्षमता असतानाही कांबळे सर रामला अधिक प्रसिद्धी मिळेल म्हणून मोर्चाचे नेतृत्व देत नाहीत.चळवळीत रामवर अन्याय होतो. कांबळे सरांचा भाऊ 'मण्या' सुमीवर बलात्कार करण्याचा प्रयत्न करतो.त्यावेळी मांगाची पोरं मण्याला धरून ठेवतात. पण रामला काहीच करता येत नाही. गावातील सवर्णाने सुमीवर बलात्कार केला म्हणून रामने सुमीला न्याय मिळण्यासाठी आंदोलन केले, मोर्चे काढले. पण आता एका दलितानेच बलात्काराचा प्रयत्न केला, तो दलित एका प्रतिष्ठित नेत्याचा भाऊ असतो. त्याच्या दडपणामुळे आपण काहीच करू शकत नाही

या विचाराने राम अस्वस्थ होतो. त्याच्या या अवस्थेचे चित्रण करताना निवेदक म्हणतो, "आज रामची जीब छाटली हूती. रामचे हात पाठीमागं बांधल्ते. त्येला धड रडता येत हुतं ना सोसता. कुणाविरूद्ध मोर्चा काढायचा? कुणाविरूद्ध अंदूलन करायचं? कुणाविरूद्ध निवेदन देयाचं? दातबी आपलेच, व्हटबी आपलेच. मण्याच्या जागी दुसऱ्या जातीचा असता तर उद्याच मोर्चा निगला असता. एखादी पोलिस चौकीबी जाळली असती. पण आता कोण कुणाविरूद्ध न्याय मागायचा."[२] अशा विचाराने राम बैचेन होतो. याविरूद्ध तो कांबळे सरांबरोबर बोलतोही. पण सुमी व मण्याचे लग्न लावायला कांबळे सर तयार होत नाहीत व हे प्रकरण दडपून टाकतात. आपण सुमीला न्याय देऊ शकलो नाही ही भावना रामला अस्वस्थ करते.

आंबेडकर पुतळा उभारण्यावरून पँथर आणि व्यापारी यांच्यात वाद होतो व त्याचे रूपांतर दंगलीत होते. दंगलीत रामची झोपडी जाळली जाते. रामला मारहाण होते. जखमी रामपुढे प्रश्न निर्माण होतो तो पुतळ्याचा. पुतळ्यामुळे दंगली घडल्या तर सरकार पुतळ्यास परवानगी देणार नाही म्हणून तो सरांना म्हणतो, "सर, आपण पुतळा आपल्या अस्मितेसाठी मागितला. आपल्या मागणीनं जर राज्यात शांततेला व्यत्यय येत असेल तर निष्ठूर शासन आपली मागणी दडपून टाकेल."[३] जखमी अवस्थेतही रामला आपल्या चळवळीची काळजी वाटते. शहरात पुतळाविरोधी वातावरण निर्माण होऊन दंगली होतात. दलितांच्या झोपड्या पेटवल्या जातात त्यावेळी रामच्या आईचा आजार बळवतो. आईचा इलाज करण्यासाठी तो मुंबईला जातो. मुंबईतील मुसळधार पावसात टॅक्सीने आईला घेऊन शिंदेच्या झोपडीत जातो.आई अधिकच आजारी पडते तिला उलट्या होतात. राम, शिंदे व शिंदेचा बाप तिला दवाखाण्यात घेऊन जात असतानाच वाटेत तिचा मृत्यू होतो.आई मेल्यानंतर तिचे कार्य थाटामाटात करण्याचे स्वप्न पाहणारा राम, आपल्या आईला नवीन लुगडेही घेऊ शकत नाही. प्रेत कसे तरी चिखलाआड करून तो शिंदेच्या झोपडीत राहतो.

रामच्या मनात चळवळीविषयक विचार घोंघावू लागतात. पण तो मुंबई सोडून येऊ शकत नाही. त्याने डॉ.आंबेडकर पुतळा निधीतील पैसे आईला मुंबईत आणण्यासाठी खर्च केलेले असतात. त्यामुळे संघटनेत त्याची बदनामी होते. संघटनेतील

कार्यकर्ते त्याच्यावर चिडलेले असतात. पुतळा निधीतील पैसे जमविण्यासाठी राम उदासपणे मुंबईत राहून काम करतो. तो सतत चिंताग्रस्त रहातो. त्याला सतत चळवळीविषयीची ओढ लागलेली असते. परंतु तो पँथरवाल्यांकडे जावू शकत नव्हता. निवेदक म्हणतो, "पँथरवाल्यात त्येची जाण्याची छाती होत न्हौती, पुतळ्याचा निधी घेऊन आल्यापासून राम जिव्हारी जखमेचं काळीज छिनून जगत हुता. माय मेली. पैसे गेले अन् रामही माणसातून उठला."[४] त्याला एकदिवशी संभा शिंदेच्या मदतीने सुमी व तिची आई भेटते. सुमी वेश्या व्यवसाय करीत असते, हे समजल्यानंतर तो अधिकच अस्वस्थ होतो. तो सुमीवर प्रेम करत असतो. पण त्याने ते कधी व्यक्त केले नसते. सुमीने हा व्यवसायाच स्वीकारल्याचे पाहिल्यावर त्याची जगण्याची उमेद संपते.

राम मुंबईला आल्यानंतर दंगल शांत होते. चळवळ पूर्वीप्रमाणे अधिक जोमाने कार्यरत होते. डॉ.बाबासाहेबांचा पुतळा उभा करण्यासाठी मोठे आंदोलन होते. चेल्याची प्रेयसी नंदा डॉ.बाबासाहेबांचा पुतळा बसविण्यात शासन विलंब करीत आहे, शासनाचा निषेध करण्यासाठी ती आत्मदहन करते. राम ही बातमी वाचून अधिकच अस्वस्थ होतो. या प्रकरणामुळे त्याला स्वत:विषयी संताप येतो. चळवळ आठवू लागते. आपली आगतिकता त्याला जाणवते. नंदाच्या आत्मदहनामुळे निर्माण झालेल्या तणावपूर्ण वातावरणातच आंबेडकर पुतळ्याची विटंबना होते. त्यामुळे संपूर्ण शहर दंगलीने पेटते. गौत्याचा खून होतो. सरांच्या घरावर दगडफेक होते. सामानाची तोडफोड होते. या वातावरणामुळे राम पेटून उठतो. "धडपडणाऱ्या मशीनगन्समधून पेटता दारूगोळा बेचिराख बाहेर पडावा तसा प्रलय रामच्या डोक्यात तांडवनृत्य करीत हुता. हात वणव्यासारखे आक्राळ-विक्राळ पेटत हुते. राम मंत्रालयाकडे झेपावत हुता. हातात पत्रके हुती अन् अंत:करणात आगीचा नाच."[५] अन्यायाविरूद्ध पेटून उठणारा राम येथे चित्रित झाला आहे.

अशाप्रकारे दलित पँथर चळवळीतील राम ही महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा 'भिन्नलिंगी' या कादंबरीत आली आहे. काही प्रसंगामुळे चळवळीपासून दुरावलेला परंतु त्याच्या अंत:करणात संपूर्ण चळवळ असलेला रान येथे दिसतो. तो एकटा असतानाही मुंबईत पत्रके घेऊन मंत्रालयावर जातो. यामधून त्याचे चळवळीतले असे योगदान दिसून

येते. एका निष्ठावंत कार्यकर्त्याचे चित्रण या ठिकाणी दिसून येते. चळवळीमुळे सर्वस्व गमावले तरीही शेवटपर्यंत चळवळ करीत राहणे हीच कार्यकर्त्याची चळवळीशी बांधीलकी असते, ती रामच्या व्यक्तिरेखेतून दिसून येते.

**१.२ प्रा. कांबळे :**

'भिन्नलिंगी' कादंबरीतील कांबळे सर ही महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा आहे. या व्यक्तिरेखेमधून लेखकाने शिक्षित, नोकरदार दलितांमधील बदल दाखविलेला आहे. प्रा. कांबळे विषयी सांगताना निवेदक म्हणतो, "कांबळे सर प्राध्यापक हुते. त्यांचं इंटरकास्ट लग्न झालेले. ते पँथरचे अध्यक्षबी हुते. त्येनी बाबासाहेबावर एक पुस्तकबी लिवल्त. त्येंच्या गोठीला वजन हुत. कांबळे सर बौद्ध धर्मावर पीएच.डी. करत हुते."[६] सर आपल्या ब्राह्मण पत्नीसोबत शहरात राहतात. त्यांना दलितांची घाण-घाण बोली, घाणेरडे राहणीमान, अश्लील बोलणे, भांडणे ऐकायची नसतात. त्यांना सुशिक्षीत उच्चवर्णीय जीवनाचा हव्यास असतो. त्यांनी दीडशे रूपये भाडे देऊन एक ब्लॉक घेतलेला असतो. उच्चवर्णीयांच्या चाळीत राहून ते दलितांच्यात सुधारणा करीत असतात.

शहरात प्रथमच कांबळे सरांनी 'दलित पँथर' या संघटनेची स्थापना केलेली असते. दलित तरूणांमध्ये चळवळीविषयी जागृती निर्माण करण्याचे कार्य ते करतात. सरांच्या कार्यामुळेच राम, सावंत, चेल्या, गौत्या, नंदा हे कार्यकर्ते चळवळीसाठी आहोरात्र झटत राहतात. सर त्यांचे वैचारिक प्रबोधन मात्र करत नाहीत. त्यामुळे पँथरमधील मुले भाषणामध्ये आक्रमक, अश्लील भाषेचा वापर करतात. त्यांचे राहणीमान बेडर बनते. हिंदू देव देवतांना ते सभेमध्ये शिव्या घालतात. त्यामुळे सवर्ण युवकांबरोबर पँथरची सतत भांडणे होतात. कांबळेसरांचा चळवळ चालविण्यामागील हेतू प्रसिद्धी मिळविणे हा असतो. आपली नेता म्हणून प्रसिद्धी व्हावी याकडे त्यांचे लक्ष असते. बोरगावातील दलित युवकाच्या खुनाचे प्रकरण घडते त्यावेळी सरांपुढे प्रश्न पडतो, "बोरगावाला जावं तर मोर्च्याचं नेतृत्व कोण करील? वर्तमानपत्रात कुणाचं नाव छापून येईल? बोरगावाला नाही गेलं तर? बोरगवाचं सर्व श्रेय रामला मिळेल!"[७] यावरून सरांना एखाद्या प्रश्नाच्या सोडवणूकीपेक्षा प्रसिद्धीची अधिक हाव असते हेच दिसून येते.

बोरगावमधील खुनाच्या प्रकरणात प्रा. कांबळे पैसे खातात आणि हे प्रकरण मिटवतात. आपला मेव्हणा संदिपान बरोबर रामलाही हॉटेलमध्ये जेवायला नेऊन त्याच्यावर आपला प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करतात. पँथरमधील सर्व युवक सरांच्या नेतृत्त्वाखाली चळवळीचे काम करतात. सरांविषयी सर्वांना आदर असतो. पण सर चळवळीचा वापर प्रसिद्धी मिळविण्यासाठी करत आहेत हे काही तरूणांच्या लक्षात येते. पण कोणीही याबाबत बोलत नाही. त्यांची पत्नी आजारी असल्यामुळे ती त्यांना नकार देते. त्यावेळी ते आपल्या पत्नीवर जबरदस्ती करतात. यामधून कांबळे सरांमधील अमानवी वृत्तीचे दर्शन घडते.

शहरात पुतळाविरोधी वातावरण निर्माण होवून दंगल होते. त्यावेळी सरांच्या घरावरही जमाव दगडफेक करतो. सरांचा भाऊ मण्या सुमीवर बलात्कार करण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे सुमीची सर्वत्र बदनामी होते. सुमीबरोबर मण्याचे लग्न लावण्यास राम सरांना सांगतो पण सर या लग्नाला तयार होत नाहीत. 'तो त्यांचा प्रश्न आहे!' असे उत्तर देऊन ते विषयाला बगल देतात. यावरून सरांची वैचारिकता किती फोलपणाची व दिखाऊपणाची आहे हे दिसून येते. पुतळा विटंबनेनंतर शहरात उठलेल्या दंगलीत सरांच्या घराची समाजकंटक मोडतोड करतात. घरातील सर्व सामान रस्त्यावर फेकले जाते. गौत्याचा खून होतो. गौत्याची आई संतापून सरांना थप्पड मारते, सरांचे कपडे फाडते व म्हणते, "सर, तुम्ही आम्हाला बरबाद केलो. तुमी इथं पँथर काढलो. आमच्या पोरावांची डोकी भडकावली. पोरांना पेटवून सोडलो. आमची करून खाणारी पोरं मातीमोल झाली."[८] कांबळे सरही बाबासाहेबांचा फोटो तोंडाला लावून ढसाढसा रडतात. यावरून प्रा. कांबळे यांचा स्वभाव लक्षात येतो.

प्रा. कांबळेंच्या व्यक्तिचित्रणात लेखाने चळवळ चालविणाऱ्या एका शिक्षित नेत्याचे चित्रण केले. प्रा. कांबळेमध्ये सक्षम नेतृत्त्वगुण नसतात. नेतृत्त्वगुणाच्या आभावामुळे व स्वार्थीपणामुळे चळवळ बदनाम होते, हे या व्यक्तिरेखेतून दिसते. या व्यक्तिचित्रणामध्ये गुणांपेक्षा दोषच अधिक दिसून येतात. चळवळीचे नेतृत्त्व करणाऱ्या नेत्यामध्ये हे दोष आढळतात त्यामुळे चळवळीची वाताहत होताना आपणास दिसते.

१.३ सावंत :

रामबरोबर पँथर चळवळीत काम करणारा 'सावंत' हा एक क्रियाशिल कार्यकर्ता आहे. राम व सावंत हे प्रा. कांबळे यांच्या नेतृत्वाखाली प्रामाणिकपणे रात्रंदिवस चळवळीसाठी काम करतात. सावंतची बायको सुजाता, मुलगा गौतम आणि आई असा छोटासा परिवार आहे. त्याची आई मुन्सीपालटीत कामाला असल्यामुळे रामपेक्षा सांवतची आर्थिक परिस्थिती बरी असते. एक मुलगा होऊनही सावंत कोणताही कामधंदा न करता रात्रंदिवस चळवळीत वेळ घालवितो. त्यामुळे बायको सुजाता त्याला चळवळीत जाण्यास विरोध करते. घरी त्याला टोचून बोलताना म्हणते, "पोराची सुद्ध बुध् आहे का न्है तुम्हाला? जव बगील तवा पँथर-पँथर करताव. लेकरू, बायकु दिसत्यात का न्है? येगदा बाहीर पडले की परत घरला पाऊलच लागत नाही."[९] सावंत याकडे लक्ष न देता चळवळीत काम करतो.

सावंत समतोल विचाराचा कार्यकर्ता आहे. तो सभेत कधी आपला तोल जावू देत नाही. प्रक्षोभक, अश्लील कधीही बोलत नाही. त्याचे भाषण प्रभावी, वैचारिक असते. आंबेडकर पुतळ्यास मदत मागताना तो म्हणतो, "एक दिवस चहा-पाणी नाही म्हणा, एक दिवसाचं बाळाचं दूध नाही म्हणा आणि बाबासाहेबांच्या पुतळ्यासाठी सढळ हातांनी मदत करा..."[१०] अशा भाषणामुळे व समतोल विचारामुळे चळवळीत त्याला महत्त्वाचे स्थान असते. चळवळीत प्रत्येक निर्णयात त्याच्या मताला महत्त्व असते. अशा कार्यकर्त्याला दंगलीनंतर पोलीस अटक करण्यासाठी येतात. त्यावेळी त्याची बायको पोलिसांना परखड विरोध करते, पण सावंतला शेवटी अटक केली जाते. सावंतमध्ये चळवळीचे नेतृत्त्व करण्याचे सर्व गुण असतात. पण कधीही तो पदासाठी भांडत नाही. प्रामाणिकपणे चळवळीसाठी पडेल ते काम करण्याची त्याची सदैव तयारी असते. एका आदर्श कार्यकर्त्याचे गुण त्याच्या अंगी दिसून येतात.

लेखकाने सावंतच्या व्यक्तिचित्रणामधून समंजस, शांत व समतोल विचाराच्या, स्वच्छ चरित्र्याच्या कार्यकर्त्याचे चित्रण केले आहे. कोणत्याही पदाची अपेक्षा न बाळगता हा कार्यकर्ता चळवळीसाठी आपला संसार सोडून रात्रंदिवस काम करतो. त्यामुळे चळवळीत त्याला कांबळे सरांपेक्षाही मोठे स्थान असते. लेखकाने या

ठिकाणी चळवळीतील कार्यकर्त्यासमोर एका आदर्श कार्यकर्त्याचे मॉडेलच दाखविले आहे. या कार्यकर्त्यालाही संसाराच्या विवंचना असतात. तरीही तो चळवळीच्या प्रश्नात अग्रेसर राहतो.

'भिन्नलिंगी' कांदबरीत वरील तीन व्यक्तिरेखा या चळवळीमधील मुख्य कार्यकर्त्याच्या व्यक्तिरेखा आहेत. यामध्ये गौत्या, चेल्या, मण्या,नंदा अशा चळवळीत काम करणाऱ्या इतरही काही व्यक्तिरेखा आहेत. 'भिन्नलिंगी' ही शरणकुमार लिंबाळे यांची चळवळविषयक चित्रण करणारी पहिली कादंबरी आहे. या कादंबरीतील कथानकही स्वतंत्र आहे. वरील उल्लेखाप्रमाणेही दोन विभागात विभागलेली ही कादंबरी आहे. या कादंबरीत दुसऱ्या भागात चळवळीमध्ये काम करणाऱ्या व कालांतराने नोकरी मिळाल्यानंतर चळवळीपासून दुरावलेल्या स्वार्थी, आपमतलबी व स्वहितामध्येच दंग असलेल्या कार्यकर्त्याचे चित्रण येते. त्यामुळे व्यक्तिचित्रणाच्या अभ्यासाअंती या कांदबरीला दिलेले 'भिन्नलिंगी' हे शीर्षक सपर्मक वाटते.

'उपल्या' व 'हिंदू' या शहरी व गावपातळीवरील दलित चळवळीची मांडणी करणाऱ्या कादंबऱ्या आहेत. त्यांच्या कथानकात व व्यक्तिरेखातही काही प्रमाणात संलग्नता दिसून येते. या कादंबऱ्यात समाजपरिवर्तनानुसार कालांतराने होणारे बदल व्यक्तिरेखांमधील चित्रणामधून दिसून येतात. त्यामुळे आपण या दोन्ही कादंबऱ्यामधील व्यक्तिरेखांचा व्यक्तिरेखांच्या दृष्टीकोणातून सलग विचार करणार आहोत.

### १.४ रोहिदास नागदिवे :

'उपल्या' कादंबरीत रोहिदास ही व्यक्तिरेखा येते. कॉलेज युवक ते समाजकल्याण मंत्री अशी रोहिदासची येथे वाटचाल दिसून येते. रोहिदास हा कॉलेजमधील बंडखोर युवक असतो. तो कॉलेजमध्ये दलित विद्यार्थ्यांची 'रिपब्लिकन स्टुडण्ट असोसिएशन' ही संघटना चालवितो. मिलिंद, भीमा भोळे, गौतम गांगुर्डे, दयानंद किणीकर, चंद्रकांत अंभोरे, पंडित कानडे, गोविंद सरवदे हे त्याचे मित्र असतात. मिलिंद व मिलिंदचा ब्राह्मण रूम पार्टनर 'अनि' यांना रोहिदास हा सिनिअर असतो. अनि व रोहिदास यांचे धर्मावरून सतत भांडण होत असते. कॉलेजमधल्या प्राचार्याच्या मुलीची छेड

काढल्याबद्दल प्राचार्यानी रोहिदासला फेल केलेले असते. मिलिंदच्या रूममध्ये गेस्ट म्हणून राहून तो दलित विद्यार्थी संघटना चालवत असलेला दिसून येतो.

स्वतंत्र विचाराचा रोहिदास ज्यावेळी कॉलेजमधील विद्यार्थी पँथर संघटनेत सामील होण्याचा विचार करतात तेव्हा त्यांना विरोध करतो. तो सर्वांना सांगतो, "रिपब्लिकन स्टुडण्ट असोसिएशन बरखास्त करणे मला पटत नाही. आपण ह्या संघटनेचे सर्वेसर्वा आहोत. ह्या संघटनेमुळं आपल्याला ओळखलं जातं. ह्या संघटनेचं नेतृत्व आपल्याकडं आहे. आपली संघटना बरखास्त करून 'दलित पँथरची स्थापना करणं चुकीचं होईल."[११] यावरून त्याची स्वतंत्र वैचारिकता दिसून येते. सुरूवातीला तो पँथरमध्ये सामील होत नाही. नंतर काही कालावधीने चळवळीचे कार्य पाहून तो आपल्या कार्यकर्त्यासह पँथरमध्ये प्रवेश करतो.

रोहिदासच्या अंगी नेतृत्त्वगुण असल्यामुळे तो पँथरच्या सर्व कार्यक्रमात अग्रेसर राहून काम करतो. त्यामुळे त्याच्या कार्याचा प्रभाव संघटनेत वाढत जातो. डॉ. आंबेडकर पुतळा विटबंनेनंतर सर्व शहरामध्ये दंगली उसळतात त्यावेळी रोहिदासला अटक होते. जेलमधून बाहेर आल्यानंतर चळवळ वाढविण्यासाठी व लोकांची चळवळीला सहानुभूती मिळविण्यासाठी लोकसहभागाने तो पँथरचे कार्यक्रम आखतो. त्यानुसार 'भूमी बळकाव' आंदोलन केले जाते. या आंदोलनात रमा बाबर, मिलिंद व रोहिदास गावोगावी जाऊन लोकांना आंदोलनासाठी प्रवृत्त करतात त्यामुळे मोठ्या प्रमाणावर आंदोलन होऊन 'भूमी बळकाव' लढा यशस्वी केला जातो. नामांतर आंदोलनातही रोहिदास अग्रेसर राहून चळवळीसाठी कार्य करताना दिसतो.

लेखकाने रोहिदास ही व्यक्तिरेखा बंडखोर तसेच वैचारिक दाखविली आहे. त्याला नातीगोती व समाजाविषयी आस्था असते. त्यामुळे ज्यावेळी आपल्या ब्राह्मण मित्राची बहीण (भावना) विधवा होते. त्यावेळी ब्राह्मणावर सतत प्रहार करणाऱ्या रोहिदासलाही दु:ख होते. तो अंत्ययात्रेत सामील होतो. मित्राचे वडील व बहीण भावना यांना दु:खात सावरतो. त्यांना सांभाळून घरात आणतो. त्यांच्या दु:खात त्यांना पूर्णत: सहकार्य करतो. ज्यावेळी दयानंद भावनाबरोबर पुनर्विवाह करण्याचा विचार व्यक्त करतो. त्यावेळी रोहिदासला राग येतो. आपल्या मित्राच्या बहीणीबरोबर हे नाते जोडणे

त्याला चुकीचे वाटते. तो दयानंदच्या थोबाडात मारतो. यातून त्याचा मित्राविषयीचा जिव्हाळा दिसून येतो.

चळवळीमधील कार्यकर्ता रोहिदास हा ज्यावेळी समाज कल्याण विभागाचा कॅबीनेट मंत्री होतो. त्यावेळी कार्यकर्त्यांचाही रूबाब वाढतो. चळवळीमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण होते. मंत्री झाल्यावरही तो समाज व चळवळीस विसरत नाही. परंतु त्याच्या सोबत सतत असणारे कार्यकर्तेच त्याला समाजासाठी काही करू देत नाहीत. स्वार्थी कार्यकर्ते आपल्याला पैसा मिळविण्यासाठी समाजातील कामाकडे दुर्लक्ष करतात व वैयक्तिक फायदा करून घेतात. विजय पगारे जेव्हा माणिकचंद, गोपीचंद यांच्यासाठी बिअर बारची परमिशन मागायला जातो त्यावेळी रोहिदास त्यांना समजावून सांगताना म्हणतो, "अशी कामे घेवू नका, चळवळ बदनाम होईल."[१२] यावरून चळवळी विषयीची रोहिदासची आस्था दिसून येते.

रोहिदास चळवळ वाढविण्यासाठी, पक्ष बळकट करण्यासाठी लोकांचा, कार्यकर्त्यांशी संपर्क वाढावा म्हणून कार्यकर्त्यांच्या सहीने लोकांची निवेदने स्वीकारतो. पण कार्यकर्ते पैसे मिळविण्यासाठी त्याचा वापर करतात. त्यावेळी रोहिदास कार्यकर्त्यांना सांगतो. "कार्यकर्त्यांनी वैयक्तिक काम आणण्यापेक्षा सामाजिक कामे आणली पाहिजेत... शासकीय योजना लोकांना समजावून सांगितल्या पाहिजेत. त्याचा फायदा करून घेतला पाहिजे. आपल्या कार्यकर्त्यांनी सहकार क्षेत्रात घुसले पाहिजे. रचनात्मक कार्य केले पाहिजे. मी आज मंत्री आहे, उद्या नाही. मंत्रीपद कायमचं नसतं. जोपर्यंत हातात सत्ता आहे तोपर्यंत फायदे करून घेतले पाहिजेत."[१३] पण काही कार्यकर्ते लाचखोर, स्वार्थी वृत्तीने आपली कामे करून घेण्यासाठीच रोहिदासच्या पाठीमागे येतात. चंद्रकांत अंभोरे, भीमा भोळे, मिलिंद कांबळे यांना ज्यावेळी आपली कामे होत नाहीत हे लक्षात येते तेव्हा ते रोहिदासच्या विरोधात जातात.

अखेर रोहिदासचे मंत्रीपद जाते. मंत्रीपदावर असतानाही कार्यकर्त्यांच्या चुकीच्या धोरणामुळे समाजाला या मंत्रीपदाचा काहीच उपयोग होत नाही. याचा पश्चाताप रोहिदासला होतो. 'उपल्या' कादंबरीत रोहिदासची कॉलेज युवकापासून ते मंत्रीपदापर्यंतची जडण-घडण दिसून येते. चळवळीशी प्रामाणिक राहणारा, चळवळीची

आस्था असणारा कार्यकर्ता मंत्रीपदापर्यंत पोहचतो, असे 'उपल्या' कादंबरीत चित्रण दिसून येते. परंतु 'हिंदू' कादंबरीत रोहिदासचे चित्रण मंत्रीपद गेल्यानंतरचे आलेले आहे असे दिसून येते.

'हिंदू' कादंबरीत अचलपूर गावातील जळलेल्या दलितांच्या झोपड्यांचे पुनर्वसन तो करतो. भीमनगरच्या पुनर्वसनामध्ये रोहिदासचा पुढाकार असतो. तो दलितांची घरे बांधून देतो. पण नंतरच्या निवडणूकीत सदानंद कांबळेमुळे रोहिदासला पराभव स्वीकारावा लागतो. रोहिदासच्या पराभवामुळे चळवळीमधील एका कार्यकर्त्याची सत्ता जाते. हिंदुंनी दलिताच्या रूपात हिंदू विचारसरणीचे बाहुले बनविलेला सदानंद कांबळे समाज कल्याण मंत्री होतो. याठिकाणी चळवळीमधील कार्यकर्ताचा पराभव दिसतो. टे या व्यक्तिरेखेमधून कालांतराने समाजाचा कसा बदल झालेला आहे या बदलाचा परिणाम दलितांवर कसा होतो, हे दिसून येते.

### १.५ मिलिंद :

'उपल्या' या कादंबरीतील मिलिंद ही प्रमुख व्यक्तिरेखा आहे. मिलिंद रोहिदासला ज्युनिअर असतो. मिलिंद आणि त्याचा ब्राह्मण रूम पार्टनर यांच्यात सतत चळवळीवरून व जातीवरून भांडण होत असतात. गरीब परिस्थिती असल्यामुळे 'अनि'ला दलित मुलांबरोबर होस्टेलमध्ये राहून शिकावे लागते. त्याला दलितांप्रमाणे इतर सवलती मिळत नाहीत. मिलिंदही कॉलेजमध्ये हुशार असतो त्यामुळे अनि मिलिंदला सतत सांगतो की, तुम्ही शिक्षणासाठी इथे येता, सरकार शिक्षणासाठी तुम्हाला पैसे देते, तुम्ही शिकण्याचे सोडून कशाला चळवळ करता. पण मिलिंद त्याचे ऐकत नाही. तो चळवळीमध्ये सहभागी होतो.

कॉलेज संपल्यावर मिलिंद काँग्रेस पक्षात प्रवेश करतो. त्याचे वडील काँग्रेसचे नगरसेवक होते. तरीही त्याला काँग्रेसपेक्षा दलित चळवळीविषयी आस्था असते. त्यामुळे काही कालांतराने तो पँथरमध्ये प्रवेश करतो. काँग्रेसविषयी बोलताना तो म्हणतो, "मी वाट चुकलो होतो, माझ्या आयुष्यातील पाच वर्षे मी काँग्रेसमध्ये घालविली. आजही माझे वडील काँग्रेसचे कार्पोरेट आहेत. काँग्रेसमध्ये माणूस लाचार होतो. आमच्या रक्तातली अशांती तिथं थंड होते. काँग्रेसनं दलितांच्या प्रश्नांवर किती लढे

दिले? माझी काँग्रेसमध्ये मुस्कटदाबी होत होती. आज मी पँथर झालोय."[१४] यावरून त्याच्या धाडसी वक्तृत्वाची प्रचिती येते. मिलिंद मनुस्मृतीच्या दहनाचा जाहीर कार्यक्रम घेतो. त्यामुळे त्याला कार्यकर्त्यांसह अटक केली जाते. शहरातील वातावरण तणावपूर्ण बनते. या वातावरणामध्ये आंबेडकर पुतळ्याची विटंबना होते. शहरात दंगल पसरते. दंगलीला आटोक्यात आणण्यासाठी पोलिस गोळीबार करतात त्यामध्ये गोविंद सरवदे हा पँथरचा कार्यकर्ता मारला जातो.

सरवदे गेल्यामुळे पँथरची मोठी हानी होते परंतु मिलिंद ईश्वर इंगळे व विजय पगारे हे चळवळीसाठी काम करत राहतात. राज्य नेतृत्वाने पँथर बरखास्त केल्याची बातमी येते. काही कार्यकर्ते पँथर सोडून नवीन स्थापन झालेल्या 'मास मुव्हमेंट' या संघटनेत सामील होतात. पण मिलिंद व ईश्वर इंगळे हे 'भारतीय दलित पँथर' या नावाने संघटना चालवितात. मिलिंद सेवायोजन कार्यालयामधील भ्रष्टाचार उघडकीस आणण्यासाठी आमरण उपोषण करतो. त्यामुळे सर्व तरूणांचा त्याला पाठींबा मिळतो. उपोषणामुळे मिलिंदला खूप प्रसिद्धी मिळते.

चळवळ बळकट करण्यासाठी चळवळीत लोकांचा सहभाग महत्त्वाचा आहे हे ओळखून लोकसहभाग वाढविण्यासाठी मिलिंद व त्याचे सहकारी लोकांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करतात. मिलिंद आपल्या सहकाऱ्यांबरोबर गावोगावी फिरून भूमी बळकाव आंदोलनासाठी लोकांना जागृत करतात. रोहिदास, रमा बाबर व मिलिंद भूमी बळकाव आंदोलन यशस्वी करतात. चळवळीच्या द्वेषामुळे पँथरचे अध्यक्ष असलेल्या ईश्वर इंगळेचा खून होतो. त्यावेळी अध्यक्षपदाची जबाबदारी मिलिंदवर सोपविली जाते. मिलिंद पँथरचा अध्यक्ष झाल्यावर नामांतर आंदोलन पेट घेते. या आंदोलनाचे नेतृत्त्व मिलिंद करतो. त्याच्या नेतृत्त्वावर चिडून सवर्ण लोक मिलिंदचा गावाकडचा भाऊ देवीदास याचा खून करतात. तरीही न डगमगता मिलिंद नामांतर आंदोलनासाठी लढा देत राहतो. मोर्च्याचे नेतृत्व करतो.

मिलिंद पूर्णत: आंबेडकरी विचाराचा कार्यकर्ता आहे. त्यामुळेच त्याला 'त्रिशरण' याच्या नवीन कथासंग्रहामधील कथांविषयी राग येतो. तो त्रिशरणला रागाने बोलतो. "बाबासाहेबांनी मार्क्सला विरोध करून बुद्धाला स्वीकारलं आहे. दलित

चळवळीला वर्ग लढ्याच्या दिशेने नेणं चुकीचं आहे."[१५] या कथासंग्रहामधील कथांवर डाव्या विचारसणीचा प्रभाव पडलेला मिलिंदला जाणवतो म्हणून तो त्रिशरणला कम्युनिस्टवादी ठरवितो. अशा विरोधाने तो रागाने कथासंग्रह त्रिशरणच्या तोंडावर फेकतो. दयानंद संघाच्या व्यासपीठावरून व्याख्यान देतो. म्हणून मिलिंद त्यालाही विरोध करतो. मिलिंदला वाटते अशा भाषणामुळे आपल्या समाजातील जनतेची दिशाभूल होईल. संघाच्या पुरोगामी ढोंगामुळे पददलितांची फसवणूक होईल. चळवळीमधील कार्यकर्त्याचा इतर चळवळीतील कार्यकर्त्यांशी असलेल्या संबंधाला मिलिंदचा विरोध असतो. आपण पूर्णत: चळवळीशी बांधिल राहिले पाहिजे असा मिलिंदचा विचार असल्याचे त्याच्या व्यक्तिरेखेतून दिसून येते.

चळवळीशी एकनिष्ठ राहणाऱ्या मिलिंदमध्ये कालांतराने बदल होतो. काँग्रेस आणि आर.पी.आय.च्या युतीमुळे रोहिदासला मंत्रीपद मिळते. तेव्हापासून मिलिंदमध्ये बदल जाणवतो. आपल्या सहकाऱ्याला मंत्रीपद मिळाल्यामुळे त्याच्या मनात ईर्ष्या निर्माण होते. त्याचा स्वाभिमान दुखावला जातो. तो काँग्रेस व आर.पी.आय. युतीविरोधी सतत भूमिका घेत राहतो. युतीबाबत बोलताना तो म्हणतो, "काँग्रेसनं कुठलीही दलित संघटना वाढू दिली नाही. आपली खेळणी केली. काँग्रेसला वाटतं, एखादा पक्ष पैशानं संपवता येतो, गरीब माणसाला विकत घेता येते, हवा तो माणूस निवडून आणता येतो. हे काँग्रेसचं गणित चुकवलं पाहिजे."[१६] त्याची ही पोटतिडकीची भाषा चळवळीबद्दलचे प्रेम व्यक्त करते आणि काँग्रेसमुळे आपणाला मंत्रीपद न मिळता रोहिदासला मिळाले आहे, ही नाराजीसुद्धा त्याच्या बोलण्यातून दिसून येते. रोहिदास काँग्रेसधार्जिणा आहे, काँग्रेसवालेही रोहिदासलाच पाठींबा देणार म्हणून निवडणूक लढविण्यासाठी मिलिंद भाजपमध्ये प्रवेश करतो, याठिकाणी चळवळ मोडून पडते. जो मिलिंद मनुस्मृतीची होळी करतो तोच स्वार्थासाठी, पद मिळविण्यासाठी मनुस्मृतीची पूजा करणाऱ्यांच्या पाठीमागून जातो.

लेखकाने मिलिंदच्या व्यक्तिचित्रणामधून सुरूवातीला चळवळीशी एकनिष्ठ राहणाऱ्या कार्यकर्त्याचे चित्रण केले आहे. तोच कार्यकर्ता स्वार्थासाठी तत्त्वांना विसरतो. त्यामुळेच चळवळीचा ऱ्हास होतो. सत्तेचा उपयोग चळवळ वाढविण्यासाठी करावा हा

रोहिदासचा विचार असतो तर सत्तेमुळे आपली वैयक्तिक कामे व्हावी हा मिलिंद व इतर कार्यकर्त्यांचा विचार असतो. त्यामुळे सत्तेत जाण्यासाठी एक प्रभावी संघटन कसे तूटते हे 'उपल्या' कादंबरीतील मिलिंदच्या व्यक्तिरेखेमधून दिसून येते.

'उपल्या' कादंबरीत सुरूवातीला मिलिंद ही व्यक्तिरेखा आक्रमक व आंबेडकरी विचाराची दिसून येते. पण मिलिंद शेवटी सत्तेसाठी भाजपमध्ये प्रवेश करतो असा कादंबरीचा शेवट दिसून येतो. 'हिंदू' कादंबरीत मिलिंदचे चळवळीपासून दूर होणे, त्यामुळे त्याच्यातील आंबेडकरीवादी विद्रोहीपणा नष्ट होणे व एका नपुंसक माणसासारखी त्याची अवस्था होणे, असे चित्रण या कादंबरीत आलेले दिसून येते.

मिलिंद नोकरी करून चळवळीला वेळ देत असतो. तो म्हणतो, "मी पूर्ण वेळ कार्यकर्ता नव्हतो. नोकरी करणारा माणूस, खांद्यावर झेंडा घेवून फिरू शकत नाही. जे बेकार होते ते चळवळीचे म्होरके झाले होते. त्यांनी मोर्चे काढले, सभा घेतल्या, भाषणं केली. त्यांनी कधी स्थैर्याचा विचार केला नाही. ते लढले नगरसेवक झाले. आमदार झाले. मंत्री झाले. मी नोकरी केली आणि कर्जाचे हप्ते फेडले."[१७] अशी आपली तो मनोव्यथा व्यक्त करते. आपण नोकरी केली नसती, स्थीर होण्याचा विचार केला नसता तर आपणही चळवळीच्या माध्यमातून आमदार, मंत्री झालो असतो अशी बोचणी मिलिंदला लागून राहते.

एकेदिवशी माणिकचंद व गोपीचंदबरोबर अचलपूरला जात असताना त्यांच्या गाडीसमोरच तात्या कांबळेचा खून होतो. खून करणाऱ्या प्रभाकर कावळेला मिलिंद जवळून बघतो. तरीही तो स्तब्ध राहतो. घाबरलेल्या बधीर अवस्थेतील मिलिंदला प्रश्न पडतो, "मी जिवंत आहे की मृत? मी कार्यकर्ता आहे की नपुंसक? तात्या कांबळेची हत्या झाली असताना मी शांत कसा?"[१८] तात्या कांबळे दलित चळवळीतील कार्यकर्ता असतो. त्यांनी गावोगाव जलस्याद्वारे दलितांना त्यांच्यावरील अन्यायाची व हक्काची जाणीव करून दिलेली असते.

एका सुधारणावादी दलित कार्यकर्त्याचा खून मिलिंदच्या समोर होऊनही तो गप्प बसतो. लाचारीमुळे तो माणिकचंद व गोपीचंदबरोबर त्यांच्या गाडीतून फिरतो, दारू पितो. त्याबद्दल मिलिंदला काहीच वाटत नाही. उलट सवर्णांबरोबर रहायला त्याला

सुखावह वाटते. तो अभिमानाने सांगतो, "आजही सवर्णांबरोबर समानतेने बसून दलितांना पाणी पिता येत नाही. मी त्यांच्याबरोबर समानतेने दारू पित होतो."[१९] त्याला सवर्णांबरोबर राहण्यात अभिमान वाटायचा. त्यामुळे चळवळीचे नुकसान होते, याची त्याला जाणीव राहत नाही. ही जाणीव ज्यावेळी भीमा भोळे, पंडित कानडे, चंद्रकांत अंधारे, रमा बाबर करून देतात त्यावेळी मिलिंदला त्यांचा राग येतो. तो रागाने बोलतो, "मी तुमचा कार्यकर्ता नाही. मी चळवळीची बांधीलकी मानणारा एक सामान्य कार्यकर्ता आहे. मी संघवाल्याबरोबर दोस्ती करेन. कम्युनिस्टांबरोबर प्रेमाने वागेन, समाजवाद्यांबरोबर गप्पा मारेन. मी वेश्येकडे जाईन, दारू पिईन, मला योग्य वाटेल ते मी करेन. मी काय करावं हे सांगण्याचा अधिकार तुम्हाला नाही... तुम्ही चळवळीसाठी खुप त्याग केला असेल. पण मी माझं व्यक्तिस्वातंत्र्य कोणाकडेही गहाण टाकणार नाही."[२०] या दीर्घ निवेदनातून मिलिंदच्या चळवळीविषयक बदललेल्या भावना व स्थार्थी वृत्तीही दिसून येते.

तात्या कांबळेचे खूनी निर्दोष सुटतात त्यावेळी रागाने स्त्रीवेषातील कबीर कांबळे सर्वांच्या समोर खुनी प्रभाकर कावळेवर गोळ्या झाडून त्याचा खून करतो. अचलपूरातील भीमनगरमध्ये परत जाळपोळ होण्याची शक्यता असते. वातावरण गंभीर असते. परंतु मिलिंदला आपल्या या बांधवांची काहीच काळजी नसते. तो माणिकचंद व गोपीचंद यांच्या गाडीत बसून चैनी करण्यासाठी निघून जातो. रस्त्यावरील हिजड्याला बघून त्याला आपल्यातील बदल जाणवतो. आपण चळवळीपासून दूर होऊन पुरूषार्थ गमवलेला आहे असे त्याला वाटते. आपल्या वर्तणूकीवर भाष्य करताना तो म्हणतो, "ही नपुसक होण्याची प्रक्रिया आजची नाही. ती फार मोठी प्रोसेस आहे. जेव्हा मी चळवळीपासून विभक्त झालो होतो तेव्हा माझ्यात नामर्दपणाची लागण झाली होती."[२१] हे त्याचे आत्मपरीक्षण चिंतनीय वाटते. लेखकाने 'मिलिंद' या व्यक्तिरेखेमधून चळवळीमधील एक विद्रोही आक्रमक कार्यकर्त्याचे चळवळीपासून दूरावणे आणि नामर्दपणाने वागणे आणि त्याविषयीचे आत्मपरीक्षणही करणे हे या कादंबरीत दिसते.

### १.६. गौतम गांगुर्डे :

'उपल्या' कादंबरीत आलेली गौतम गांगुर्डे ही चळवळीमधील एका कार्य

कर्त्याची व्यक्तिरेखा आहे. गौतम गांगुर्डे, भीमा भोळे आणि पंडित कानडे रूप पार्टनर म्हणून निकममामाच्या एका खोलीत रहात असतात. चळवळे विद्यार्थी म्हणून त्यांना हॉस्टेलला प्रवेश मिळत नाही. गौतम हा 'रिपब्लिकन स्टुडंट असोशिन'चा उपाध्यक्ष असतो. राज्यभर दलित पँथरचे वारे वाहत असते. त्यामुळे आपणही दलित पँथरची शाखा काढली पाहिजे असे तो मुलांना वारंवार पटवून सांगताना म्हणतो, "आपली संघटना आपल्या होस्टेलपुरती मर्यादित आहे. आपण दलित पँथरची स्थापना केली तर आपल्याला मोठा पाठींबा मिळेल. आपल्या मागे एक ताकद निर्माण होईल. आपल्यावर अन्याय झाला तर राज्यभर आंदोलन होईल. आपण 'छोट्या संघटनापेक्षा बलाढ्य सघटनेत सामील होणं ही काळाची गरज आहे." [२२]

गांगुर्डेच्या उदात्त विचाराने व पुढाकाराने शहरात पँथरची पहिली शाखा निर्माण होते. गौतम गांगुर्डे यांचीच अध्यक्षपदावर निवड केली जाते. गांगुर्डे आपल्या नेतृत्वगुणामुळे पँथर वाढविण्यासाठी प्रयत्न करतो. त्याच्या नेतृत्वाखाली इंगळे व रोहिदास आपल्या कार्यकर्त्यासह पँथरमध्ये प्रवेश करतात. पण काही दिवसातच गांगुर्डेला नोकरीचा कॉल आल्यामुळे तो चळवळ सोडून नोकरी करतो. गांगुर्डे आणि चळवळीचा संबंध तुटतो. कालांतराने ज्यावेळी रोहिदास समाजकल्याण मंत्री होतो, त्यावेळी चिन्मय देशमुख याच्या जागेवर विश्वासू सहकारी या नात्याने गौतम गांगुर्डेची निवड पी.ए.म्हणून करतात. गांगुर्डेच्या नेतृत्वाखाली पँथरमध्ये प्रवेश करून रोहिदास मोठ्या पदावर आलेला असतो व गांगुर्डेला पी.ए.म्हणून काम करावे लागते. तरीही गांगुर्डे सुरूवातीला आस्थेने सर्व कामे करतो. गांगुर्डेला चळवळीविषयी आस्था असते म्हणून साहेबांच्या दौऱ्याची व कार्यकर्त्यांची तो काळजी घेतो.

कालांतराने गांगुर्डेमध्येही बदल होतो. "मी भ्रष्टाचार करणार नाही. आणि भ्रष्टाचार करणाऱ्याला मदत करणार नाही."[२३] अशा प्रकारची वल्गना करणारा गांगुर्डे माणिकचंद व गोपीचंद यांचाकडून बिअरबारचे परमीशन मिळविण्यासाठी दोन पेट्या घेवूनही काम करत नाही. निवडणूक जाहीर होतात. आचारसंहितामुळे कोणतेही काम होत नाही.

'उपल्या'मध्ये चळवळीमधील युवक सत्तेमुळे कसा भ्रष्टाचारी होतो याचेच चित्रण गांगुर्डेच्या व्यक्तिरेखेतून दिसून येते. चळवळीची, समाजाची काळजी असणारा गांगुर्डे या व्यवस्थेमुळे भ्रष्टाचारी बनतो. 'हिंदू' कादंबरीमध्ये तो पी.एस.आय. होतो.

अचलपूरमधील राखीव मतदार संघातून रोहिदास, प्रा.राहूल बनसोडे, सदानंद कांबळे यांच्या विरोधात गौतम गांगुर्डे नोकरीचा राजीनामा देवून निवडणूक लढवतो. त्यावेळी भ्रष्टाचाराचे आरोप गांगुर्डेवर केले जातात. 'एका शासकीय कर्मचाऱ्याकडे एवढा पैसा कोठून आला, त्याच्या संपत्तीची चौकशी करा, अशी मागणी विरोधकांकडून होते. कसबे गुरूजी गांगुर्डेबरोबर प्रचारासाठी गावोगावी फिरत असतात. मतदार गांगुर्डेला प्रतिसाद देत नाहीत. त्यामुळे गांगुर्डे माणिकचंद व गोपीचंदला भेटून पाच लाख रूपयांच्या मोबदल्यात निवडणूकीतून माघार घेतो व त्यांच्या सल्ल्यानुसार सदानंद कांबळेला पाठींबा जाहीर करतो. अशा पद्धतीने गांगुर्डे चळवळीचा उपयोग स्वत:च्या स्वार्थासाठी करताना दिसून येतो.

माणिकचंद व गोपीचंदच्या सापळ्यात गांगुर्डे अडकतो. माणिकचंदकडून पाच लाख रूपये घेताना ॲन्टी करप्शनवाले पकडतात. गांगुर्डेला अटक केल्याचा फोटो, ते वर्तमानपत्रात पहिल्या पानावर छापून आणतात. इकडे गौतम हा अटक झाल्यामुळे दलित समाजात संतापाची लाट उसळते. पण त्याचा काहीही उपयोग होत नाही. राजकारणामुळे, स्वार्थी, लाचखोरी वृत्तीमुळे त्याचे जीवन बरबाद होते.

**१.७ विजय पगारे :**

'उपल्या' कादंबरीतील विजय पगारे ही एक व्यक्तिरेखा आहे. विजय पगारे हा कॉलेज जीवनापासून दलित पँथर चळवळीमध्ये काम करतो. पँथर चळवळीचा तो सक्रीय कार्यकर्ता असतो. बावी या गावातील मुलींवरील अन्यायावेळी त्याची कार्य कर्त्याची भूमिका दिसून येते. बावी गावातील विहिरीत एक मेलेला गर्भ सापडतो. तो गर्भ दलित तरूणीचा आहे,असा खोटा आरोप करून पोलीस दलित तरूणींना अटक करतात. या दलित तरूणींवरील अन्यायाविरूद्ध आवाज उठविण्याचे काम विजय पगारे करतो. त्याच्या नेतृत्त्वाखाली त्या दलित मुलीना न्याय मिळवून तीची निर्दोष सुटका केली जाते. अशा प्रकारे विजय पगारे यांच्या नेतृत्त्वाची याठिकाणी झलक पहावयास मिळते.

कालांतराने ज्यावेळी चळवळीत नेतृत्वासाठी गटातटाचे राजकारण होते त्यावेळी विजय पगारेला महापालिकेत शिक्षकाची नोकरी मिळते. तो चळवळ सोडून नोकरी स्वीकारतो. चळवळीपासून पूर्णत: अलिप्त राहिलेला विजय आपणास शेवटच्या प्रकरणात दिसून येतो. शेवटचे प्रकरण विजय पगारेच्या आत्मनिवेदनातून आलेले आहे. त्या ठिकाणी विजय पगारेची चळवळीविषयक भावना दिसून येतात. ज्यावेळी विजयचा मित्र रोहिदास मंत्री होतो, त्यावेळी त्याला वेगळाच आनंद होतो. तो म्हणतो "ही बातमी समजताच, "मी ताडकन उठलो. पळत सुटलो. हॉटेलात घुसलो. पेढे विकत घेतले आणि लोकांना वाटत सुटलो... आमचा नेता मिनिस्टर झाला. मी आनंदात वेडापिसा झालो होतो. जणू काय मीच मिनिस्टर झालोय असं वाटत होतं."[२४] मित्राच्या आनंदात आनंद मानणारा विजय रोहिदासला भेटण्यासाठी बायकोच्या गळ्यातील मंगळसूत्र गहाण ठेऊन मुंबईला जातो.

मुंबईवरून आल्यानंतर विजयच्या ननात प्रश्न निर्माण होतो की, आपण रिपब्लिकन-काँग्रेस युतीच्या प्रवाहात वहात जावे की नको? कारण "बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटलं होतं. काँग्रेस हे जळतं घर आहे. असे असेल तर आपण ह्या सभागृहात का प्रवेश करावा? बाबासाहेंबानंतरचे दलित राजकारण काँग्रेसच्या आधारानंच वाढलं आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, "लोकशाहीत प्रबळ विरोधी पक्षाची गरज आहे. आम्ही बाबासाहेबांचे अनुयायी. सत्ताधारी पक्षाचे हात बळकट करत आहोत. बाबासाहेबांना राजकारण कळलं होतं, की आम्हाला?"[२५] या विचाराने विजय पगारे गोंधळतो परंतु परिस्थितीमुळे युतीच्या प्रवाहात सामिल होतो.

विजय पगारे हे मंत्री रोहिदास यांचे जवळचे मित्र अशी ओळख वाढल्यानंतर विजयला भेटायला लोक येतात. माणिकचंद, गोपीचंद बिअर बारचे लायसन मिळविण्यासाठी विजयशी मैत्री वाढवतात. विजयला लोक सरकारी ऑफिसमधील कामे करण्यासाठी, पोलीस स्टेशनमधील कामे ओळखीने करण्यासाठी खूष करतात. माणिकचंद व गोपीचंद त्याला बारला घेवून जातात. हॉटेलमध्ये पार्टी देतात. मुंबईला घेऊन जातात, बाई बाटली यांची व्यवस्था करतात. सिताफळे या ड्रायव्हरची बदली करण्यासाठीही विजय त्यांच्यापासून पैसे घेतो. पण या दोघांचीही कामे विजय करू शकत

नाही. गौतम गांगुर्डे हा रोदिसचा पी.ए.व विजयचा मित्र पार्टीकडून पैसा घेतो व काम करत नाही त्यामुळे शेवटी विजयची केवीलवाणी अवस्था होते.

विजय पगारे यास चळवळीची परिपूर्ण माहिती असते.त्याला पँथर चळवळीची त्याने सुरूवात पाहिलेली आहे.ज्यावेळी पँथर सुरू केली त्यावेळी या कार्य कर्त्यांना किती संघर्ष करावा लागला होता हे त्याने अनुभवले असते.तो पँथरचा अखेरही पाहतो.ज्यावेळी काँग्रेसबरोबर पक्षाची युती नव्हती,त्यावेळी सर्व दलित कार्यकर्ते चित्त्यासारखे चळवळीत चपळाईने काम करत होते.त्यांना सत्ता व पैशाची चटक लागल्यामुळे संपूर्ण चळवळ बरबाद होते.रोहिदासला मंत्रीपद मिळाल्यामुळे दलितांचे प्रश्न सुटतील असे वाटत असते.परंतु कार्यकर्ते स्वत:च्या कामात व्यस्त राहतात,स्वार्थी वृत्तीमुळे स्वत: पैसे घेतात त्यामुळे समाजाकडे दुर्लक्ष होते व सामान्य लोकांचे प्रश्न 'जैसे थे' राहतात. कार्यकर्त्यांच्या अंतर्गत राजकारणामुळे मिलिंद, भीमा भोळे असे कार्यकर्ते पदासाठी भाजपमध्ये जातात. त्यामुळे दलितांच्या चळवळीचे तुकडे पडलेले दिसतात.

या सर्व परिस्थितीचा विचार करून विजय पगारे मंत्रीपद गेल्यानंतरही रोहिदासला भेटायला जातो. त्यावेळी त्याला मंत्री रोहिदासच्या चेहऱ्यावर भग्न शांतात दिसते. तो म्हणतो, "मी त्यंच्याकड पाहिल. त्याच्या नजरेला नजर भिडवली. त्याची नजर उग्र, उदास आणि पाषाणासारखी वाटली. त्यांच्या नजरेत मंत्रालय दिसलं. मंत्रालयाच्या दावणीला बांधलेला हजारो चित्यांचा कळप दिसला. मी भ्यालो. सर्व चित्ते मरून पडले होते."[२६] या त्यांच्या कथनातून चळवळ संपलेली दिसून येते. मंत्रीपदाच्या हव्यासापोटी दलित चित्ते आपली चळवळ, आपला संघर्ष, कार्य विसरून गेलेले दिसतात. राजकारणामुळेच दलित चळवळ संपुष्टात आल्याचे चित्रण लेखकाने विजय पगारे या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून केलेले दिसते.

कादंबरीच्या सुरूवातीला या व्यक्तिरेखेचे महत्त्व समजत नाही पण शेवटी समजते. 'उपल्या' कादंबरीत १५ जून या दिवसापासून दैनंदिनीवजा विजय पगारेचे आत्मनिवेदन ६ डिसेंबरपर्यंत मंत्री रोहिदासचा जयजयकार करणारे आहे. पुढील जानेवारी ते शेवटी ६ डिसेंबरचे निवेदन हे रोहिदासचा धिक्कार करणारे आहे

त्याच्याविषयी समाजाची नाराजी व्यक्त करणारे आहे. अशा दीड वर्षाच्या रोहिदासच्या मंत्रीपदाचा कार्यभर आपणाला विजय पगारेच्या दैनंदिनीवजा कथनातून पहायला मिळतो.

विजय पगारे या व्यक्तिरेखेमधून आपणाला दलित चळवळीतील क्रियाशील नेता पहायला मिळतो. मध्यंतरी त्याला बाहेरील लोकांमधून काही चुकीच्या सवयी लागतात. त्याच्या हातून अपराध घडतात. पण त्याला या अपराधांबद्दल पश्चाताप होतो. त्याला आपल्या चुकांची जाणीव होते. त्याला आपल्या गरीब परिस्थितीवर मात करण्यासाठी वाईट मार्ग स्वीकारावा लागतो. पण तो चळवळीला विसरत नाही. चळवळीचा आरंभ व शेवट आपणाला या व्यक्तिरेखेच्या चित्रणामधून पहावयास मिळतो. शेवटपर्यंत एखाद्या नेत्याशी एकनिष्ठ राहणे, त्याच्या सर्व कार्यामध्ये, सुख-दु:खामध्ये त्याच्यासोबत असणे हे चांगल्या कार्यकर्त्याचे लक्षण आहे, हेही या व्यक्तिरेखेमधून पहावयास मिळते.

**१.८ प्रा. राहूल बनसोडे :**

प्रा. राहूल बनसोडे ही व्यक्तिरेखा 'उपल्या' व 'हिन्दू' या दोन्ही कादंबरीमध्ये सलगपणे चित्रित झालेली आहे. राहूल बनसोडे हे आर्य समाजाच्या कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम करीत असतात. त्यांची निवड राखीव जागेतून झालेली असते. चळवळीपासून सतत अलिप्त राहण्याचा ते प्रयत्न करीत असतात. नीटनेटके कपडे वापरत व सभ्य, प्रमाण, जिला शुद्ध मानले जाते अशा भाषाशैलीचा वापर बोलण्यात करतात. ते उच्चवर्णीयांप्रमाणे राहण्याचा प्रयत्न करायचे पण त्याच्या चेहऱ्यावरून ते दलित असल्याचे समजत होते. प्रा. बनसोडे हे एकमेव पीएच.डी. झालेले सिनिअर प्राध्यापक होते. त्यामुळे विद्यापीठ नियमानुसार त्यांना प्राचार्यपद मिळणार असते. बनसोडे प्राचार्य होण्यास उत्सुक असतात. त्यामुळे विद्यापीठाकडे नियमानुसार प्राचार्यपद मिळण्याची मागणी करतात. संस्थेला मात्र अस्पृश्य मानलेल्या जातीचा मनुष्य प्राचार्यपदी नको असतो, त्यामुळे प्रा. बनसोडे व संस्थापक यांच्यामध्ये तणाव निर्माण होतो. प्रा. बनसोडे यांनी नोकरी सोडून जावी यासाठी कॉलेजमध्ये त्यांना त्रास देण्यास सुरूवात होते. त्यांच्यासंबंधी विविध अफवा पसरवल्या जातात. त्यांची बदनामी केली जाते. एक दिवशी प्राचार्य आपल्या केबीनमध्ये बोलवून

गुंडाकरवी प्रा.बनसोडेंना मारहान करून धमकी देतात. या सर्व त्रासाला कंटाळून प्रा.राहूल बनसोडे नोकरीचा राजीनामा देतात. या ठिकाणी लेखकाने एकटे पडलेल्या दलितांवर, सवर्ण कशाप्रकारे जातीयवादातून अन्याय करतात हे दाखविले आहे. प्रा.कांबळे एकटे राहतात. ते चळवळीत कधी सामील होत नाहीत त्यामुळे त्यांच्यावरील अन्यायाला वेळीच वाचा फोडली जात नाही.

अन्यायामुळे प्राध्यापक पदाचा राजीनामा दिल्यानंतर प्रा.बनसोडेंना चळवळीचे महत्त्व पटते. ते चळवळीचे काम सुरू करतात. आंबेडकर पुतळा उभारण्यासाठी निधी जमा करतात. त्यावेळी विजय पगारे त्यांना पुतळा उभारण्यापेक्षा मुलांसाठी वसतिगृह काढा असा सल्ला देतो, तेव्हा बनसोडे पोटतिडकीने म्हणतात, "मला माझ्या समाजाला साक्षर करायचं नाही, स्वाभिमानी करायचं आहे."[२७] यामधून त्यांच्या स्वाभिमानी विचाराची जाणीव होते आणि त्यांचा स्वाभिमान दुखावल्याचेही स्पष्ट दिसून येते. त्यांनी स्वाभिमानाने आपल्या प्राचार्यपदाच्या हक्काची मागणी केली होती म्हणूनच त्यांना नोकरीस मुकावे लागले होते. नोकरी गेली तरीही सुरूवातीस काही काळ ते डगमगले नाहीत. आपल्यावरील अन्यायाचा प्रतिकार करत राहीले.

काही काळानंतर मात्र प्रा.बनसोडेंना आर्थिक परिस्थितीमुळे लाचारी स्वीकारावी लागते. नोकरी गेल्यामुळे त्यांची आर्थिक कुचंबना होते. त्यामुळे रोहिदास मंत्री झाल्यावर ते रोहिदासकडे मदतीसाठी धाव घेतात. रोहिदासने संस्थापकांना फोन केला तर आपल्याला परत कामावर घेतील अशी त्यांची अपेक्षा असते म्हणून ते रोहिदासला विनंती करण्यासाठी येतात. यामधून एका स्वाभिमानी दलितांवर कशाप्रकारे अन्याय करून त्याला ही व्यवस्था लाचार बनविते हे दिसून येते. लिंबाळेंनी 'उपल्या' कादंबरीत या व्यक्तिरेखेमधून एका स्वाभिमानी हुशार प्राध्यापकाला सवर्ण समाजाच्या जातीयवादी दृष्टिकोणातून कसे स्वाभिमानशून्य जीवन जगावे लागते हे दाखविले आहे. तसेच प्रा.बनसोडे यांचा व्यवस्थेविरूद्धचा चिवट संघर्षही चित्रित झाला आहे.

'हिंदू' कादंबरीत लेखकाने प्रा.बनसोडे या व्यक्तिचित्रणाचा पुढील जीवन प्रवास मांडलेला आहे. प्रा.बनसोडे नोकरी गेल्याचे अधिक दु:ख न बाळगता आपला वेळ चळवळीसाठी देतात. चळवळीत सक्रीय होवून सतत संघटना बांधणी करतात.

प्रा.बनसोडे गावोगावी जाऊन दलितांमध्ये जागृती घडवितात. विना मोबदला लोकांची कामे करतात, तरूणांना संघटित करून 'भीमशक्ती' संघटनेद्वारे समाज एकत्रित बांधणीसाठी प्रयत्न करतात. त्यांच्या कार्यामुळे लोकांचा त्यांच्याविषयीचा विश्वास व आदर वाढतो. संघटितपणामुळे लोकांचा स्वाभिमान वाढण्यास मदत होते. दलित समाज अन्यायाविरूद्ध पेटून उठतो. अचलपूर गावातील दलित सवर्ण संघर्षामध्ये दलितांच्या बाजूने ते आंदोलनाचे नेतृत्त्व करतात. तात्या कांबळेच्या खुन्यांना शिक्षा होण्यासाठी न्यायालयीन लढाई लढतात. त्यांच्या अशा कार्यामुळे एक आदर्श दलित कार्यकर्ता अशी त्यांची ओळख या कादंबरीत दिसून येते.

विधानसभा निवडणूकीत राखीव जागेवरून सदानंद कांबळे, रोहिदास नागदिवे व गौतम गांगुर्डे यांच्या विरोधात प्रा.बनसोडेही निवडणूक लढवितात. पण प्रखर हिंदूत्वाच्या लाटेसमोर सवर्णाच्या जातीयवादी धोरणामुळे त्यांना पराभव स्वीकारावा लागतो. तरीही न डगमगता चळवळ पुढे चालू ठेवण्याचा ते निर्धार करतात. सदानंद कांबळेला मंत्रीपद मिळाल्यावर काही दलित कार्यकर्ते त्याच्या पाठीमागे जातात. त्यावेळी प्रा.बनसोडेंनाही आपल्यासोबत येण्याचा सल्ला देतात. त्यावेळी बनसोडे त्यांना परखडपणे उत्तर देतात, "ज्यांना जायाचं आहे त्यांनी जावं. माझ्यापुढे लढायांची निमंत्रणे आहेत. चळवळ जो सुरू करतो त्याला आपण कोठे आहोत? उद्या कोठे असणार आहोत? याची जाणीव असते. येणाऱ्या जाणांऱ्यामुळं चळवळ चालत नसते. कर्ता आणि निष्ठेने साथ देणारे ह्यांच्याच खांद्यावर चळवळ पुढे जात असते."[२८] अशा शब्दात चळवळीवरील निष्ठा ते व्यक्त करतात.अविरत संघर्षरत राहणे हेच चळवळीचे उद्दिष्ट आहे हे त्यांनी ओळखलेले असते.त्यामुळे कोणाच्याही पाठीमागे न जाता आपल्या विचाराने संघर्ष करीत राहणे हे आपले कर्तव्य आहे याची जाणीव ठेवून ते चळवळीस आपले पूर्ण योगदान देताना दिसून येतात.

लेखकाने प्रा.बनसोडे यांच्या व्यक्तिरेखेतून वर्णव्यवस्थेचे चटके बसलेल्या व स्वत:वरील संकटामुळे चळवळीत सामील झालेल्या एका अभ्यासू निष्ठावान कार्यकर्त्याचे चित्र उभे केले आहे. ते विचारपूर्वक गावोगावी संघटनात्मक बांधणी करताना दिसून येतात. त्यांना संघटितपणाचे महत्त्व पटलेले असते. ते कोणत्याही प्रलोभनालाही बळी

पडत नाहीत. अशा एका अभ्यासू कार्यकर्त्यांची व्यक्तिरेखा येथे दिसून येते.

**१.९ तात्या कांबळे :**

'हिंदू' कादंबरीतील 'तात्या कांबळे' ही एक महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा आहे. संपूर्ण कादंबरीतील कथानक या व्यक्तिभोवती फिरताना जाणवते. या कादंबरीत सुरूवातीला हिंदू धर्माभिमान्यांकडून 'तात्या कांबळे' या चळवळीमधील कार्यकर्त्यांचा खून होतो, या घटनेभोवतीच कादंबरीचे कथानक गुंफले आहे.

तात्या कांबळे यांचे घराणे पिढीजात तमासगिराचे असते. तात्याचे आजोबा पिराजीराव कांबळे तमासगीर होते. ते स्त्री आणि पुरूष आशा दोन्ही आवाजात गाणे गात असत. त्यांचे वडील उमाजीराव कांबळे हेही तमाशावेडेच होते. त्यांनी आपले आयुष्य तमाशाला वाहून घतेलेले होते. तमाशासाठी जुनी मोटार विकत घेऊन तंबू, कनात, लाकडी स्टेज, लाईट साऊंड व्यवस्था आणि चाळीस कलावंतांचा टोलेजंग फड त्यांनी उभा केला होता. तात्यांनी मात्र हा तमाशाचा वारसा नव्या रूपात चालविलेला दिसून येतो. तमाशा करून छंदी-फंदी लोकांची करमणूक करण्यापेक्षा अज्ञानाच्या अंधकारात चाचपडणाऱ्या समाज बांधवांना जागृत करण्याचे काम ते करतात. तमाशाऐवजी ते आंबेडकरी जलसा सुरू करतात. त्यामुळे लोकांचे प्रबोधन होवू लागते. या कामासाठी त्यांना कबीर कांबळे, मंगेश कांबळे, सिद्धार्थ पगारे, धीरज पगारे, काशीनाथ पोळके, संदीप पोळके हे तरूण मदत करतात.

तात्यांच्या जलशांमुळे अचलपूर गावातील सामाजिक वातावरण बदलते. दलित समाजामध्ये जागृती निर्माण होते. हिंदू धर्मव्यवस्थेच्या जाचातून मुक्त होण्यासाठी दलित प्रयत्न करू लागतात. अन्यायाची जाणीव या जलस्यांमधून होवू लागते. त्यामुळे लोकांच्या अंधश्रद्धांना तडे जावू लागतात. सुधारणावादी कार्यकर्ता अशी तात्यांची गणना होवू लागते. अशा रीतीने 'जलसाकार तात्या कांबळेचा गाव म्हणून अचलपूर गावची ओळख वाढू लागली. त्यामुळे गावातील सवर्णांचा त्याला विरोध वाढत जातो.

आरक्षणामुळे गावातील पोलिस पाटीला हे पद तात्याच्या पदरात पडेल ही भीती पाटील रामभाऊ कावळेला वाटते. अगोदरच तात्यांच्या विरोधात असणारे जगन्नाथ पंडित, मधूकर, गुणवंत पाटील, दीपक माने यांना तात्यांच्या विरोधात चेतवण्याचे काम

केले जाते . तात्यांच्या जलशामुळे विष्णू पुजारीसुद्धा तात्याच्या विरोधात बोलतो .

तात्यांच्या हिंदू धर्माविषयीच्या आक्रमक धोरणामुळे गावात त्याच्या खुनाचा कट रचला जातो. तात्या मात्र घाबरत नाही. हिंदू धर्माविषयी अत्यंत मार्मिक व प्रखरपणे बोलताना तो म्हणतो, "त्या धर्मात तुम्ही का राहता? जो धर्म तुम्हाला पाणी मिळू देत नाही. त्या धर्मात तुम्ही का राहता? ज्या धर्मात माणसाशी माणुसकीने वागण्याची मनाई आहे, तो धर्म शिरजोरी आहे. ज्या धर्मात अमंगळ पशूचा स्पर्श झाला असताना चालतो पण माणसाचा स्पर्श चालत नाही तो धर्म नसून वेडगळपणा आहे."[२९] अशा बोलण्यातून तात्यांच्या वैचारिकतेची दिशा समजून येते. हिंदू धर्माविरूद्धच्या संघर्षाची भावनाही प्रकट होते. तात्यांच्या अशा ज्वल जहाल विचारामुळे गावातील हिंदूंचे रक्त खवळते. त्यांच्या हिंदू धर्माभिमानाला तडा गेल्यामुळे चिडून प्रभाकर कावळे, गुणवंत पाटील, जगन्नाथ पंडित, सतीश कुलकर्णी, अनंत कलशट्टी, दीपक माने आणि नागनाथ बलशेटवार तात्याचा खून करतात .

लेखकाने या कादंबरीत तात्या कांबळे ही व्यक्तिरेखा प्रभावी व निर्भिड अशी दाखविली आहे. तात्यांच्या बोलण्यातून, त्याच्या जलस्यामधून एका आंबेडकरी विचाराचा कार्यकर्ता दिसून येतो. तो समाज जागृतीसाठी सतत प्रयत्नशील असतो. एक समजूतदार माणूस या व्यक्तिरेखेमधून पहावयास मिळतो . एखाद्या सुधारणावादी दलितांचा हिंदू धर्माभिमानी कसा बिमोड करतात व धर्म जोपासण्यासाठी हिंदू धर्मीय कोणत्या थराला जावू शकतात हेही आपणाला या व्यक्तिरेखेच्या अनुषंगाने पहावयास मिळते .

**१.१०. कबीर कांबळे :**

'हिंदू' कादंबरीमधील ही व्यक्तिरेखा आहे. लेखकाने गावातील अल्प शिक्षित तरूणांमध्ये कशाप्रकारे जागृती होवून स्वाभिमान निर्माण होतो व तो दलित तरूण अन्यायाविरूद्ध कसे पेटून उठतो हे या व्यक्तिरेखेमधून दिसून येते .

कबीर कांबळे हा अचलपूरमधील एक अल्पशिक्षित दलित युवक, तात्या कांबळेच्या विचाराने प्रभावित होवून जलस्यामध्ये काम करत असतो. तात्यांमुळे आंबेडकरी विचारांची त्याला जाणीव होते. तो जलस्यामध्ये गाणी रचतो, सूत्रधाराचे काम करतो. त्याचा आवाज पहाडी असल्यामुळे त्याला सुत्रधाराचे काम चांगले जमते.

जलस्याद्वारे लोकांमध्ये जागृती निर्माण करण्याचे काम तात्या व कबीर करीत असतात. सर्व व्यवस्थित चालले असताना धम्मचक्र प्रवर्तनादिवशी पूर्वनियोजित कटानुसार गावातील सवर्ण तात्या कांबळेचा खून करतात.

खुनानंतर गावात जाळपोळ होते. त्यावेळी कबीर कांबळेचेही घर जाळले जाते. त्याची गायही जळून मरते. त्यांना सरकारकडून नवीन घरे बांधून मिळतात. त्यांना आर्थिक हानीचा मोबदला मिळतो. पण जिवीत हानीचे काय? त्यांच्यासमोर प्रश्न निर्माण होतो? तात्यासारख्या महान कार्यकर्त्याला सवर्णांनी मारले याविषयी कबीर व त्याच्या साथीदारामध्ये राग असतो. पण ते काही करू शकत नाही? संपूर्ण गावाबरोबर हत्याराने आपण लढू शकणार नाही याची त्यांना जाणीव होते.

जलसा बंद झाल्यामुळे बासरी वाजवत, बाबासाहेबांविषयी पुस्तके वाचत तो आपली दिनचर्या करतो. काही ठिकाणी कबीरच्या बोलण्यात वैचारिकता दिसून येते. धर्मव्यवस्थेवर बोलताना तो म्हणतो, "इथल्या व्यवस्थेविरूद्ध शस्त्राने लढणे आवघड आहे कारण आपला शत्रू धर्मग्रंथामध्ये लपून बसला आहे. इथल्या माणसाच्या मना मेंदूत तो दडून बसला आहे. रोज मंदिरांची संख्या वाढते आहे. मंदिरा पुढच्या रांगा वाढत आहेत."[३०] त्यामुळे धर्मांतराने, लोकांमध्ये वैचारिक बदल झाल्याशिवाय जातीव्यवस्था नष्ट होणार नाही असे कबीरला वाटते.

कबीरच्या अशा बोलण्यामुळे व त्याच्या वर्तनातून त्याची वैचारिक प्रगल्भता दिसून येते. अहिंसात्मक मार्गानेच आपण संकटाचा सामना केला पाहिजे याची जाणीव असूनही कावळेसारख्या राक्षसाविरूद्ध हत्यार उगारलेच पाहिजे, असेही त्याला वाटते. यामधून कावळेविषयीचा त्याच्या मनातील राग दिसून येतो. त्यासाठी तो रोहितबरोबर बौद्ध धर्म स्वीकारण्यास विरोध करतो. हिंदू धर्मात राहूनच जातीअंताचा लढा लढला पाहिजे असे त्याच्या वक्तव्यावरून दिसून येते. त्यामुळे गावातील सर्व परंपरा पाळण्यास तो तयार होतो. शेवटी तात्या कांबळेच्या खुनातून निर्दोष सुटलेल्या तरूणांच्या मिरवणुकीसमोर स्त्री वेश धारण करून नाचतो व मिरवणूक कावळेच्या घरासमोर येताच प्रभाकर कावळेवर तीन गोळ्या झाडून त्याचा खून करतो.

या व्यक्तिरेखेमधून लेखकाने जहाल व मवाळ अशा दोन्ही गुणाचे व्यक्तित्त्व चित्रित केले आहे. विचारांचा सामना विचारानेच होवू शकतो पण शस्त्राचा सामनाही शस्त्रानेच केला पाहिजे, या विचाराची ही व्यक्तिरेखा पहावयास मिळते. सुरूवातीला हिंदू विरोधी जहाल विचार प्रकट करणारा कबीर नंतर मवाळ धोरण स्वीकारतो. त्यावेळी वाचकाच्या मनात त्याच्याविषयी वेगळाच विचार येतो. तोच कबीर स्त्रीवेश धारण करून मिरवणुकीसमोर नाचतो, त्यावेळी त्याच्याविषयी घृणा निर्माण होते. पण तोच कबीर ज्यावेळी खुन्यावर गोळ्या झाडतो त्यावेळी त्याच्याविषयीचे मत बदलत जाते. हिंसा करणे हे योग्य नाही, बौद्ध धर्मातही हिंसेला स्थान नाही. लेखकाने फार विचारपूर्वक ही व्यक्तिरेखा चित्रित केली आहे. ज्यावेळी सर्व मार्ग बंद होतात त्यावेळी माणसास स्वत:चा मार्ग बनवावा लागतो. त्यानुसार न्यायव्यवस्थेतून निर्दोष सुटलेल्या प्रभारकला कबीरने कायदा हातात घेऊन मृत्यूदंडाची शिक्षा केली. लेखकाने दलित तरूणांमधील जहाल विचारपरिवर्तन याठिकाणी मांडले आहे.

## २. शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा

शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबरीमध्ये ज्याप्रमाणे चळवळीमध्ये काम करणाऱ्या पुरूष व्यक्तिरेखा आढळतात त्याप्रमाणेच काही स्त्री व्यक्तिरेखाही पहावयास मिळतात. या व्यक्तिरेखा कार्यकर्त्याच्या नातेसंबंधातील आहेत. त्यामध्ये कार्यकर्त्याची आई, पत्नी व प्रेयसी अशा व्यक्तिरेखा प्रामुख्याने आढळतात. या व्यक्तिरेखा परिस्थितीचे चटके भोगलेल्या, चळवळीविषयी आत्मीयता असणाऱ्या आहेत. तर काही व्यक्तिरेखा चळवळीमुळे कार्यकर्त्याचे घराकडे दुर्लक्ष होते म्हणून चळवळीला दोष देणाऱ्याही आहेत. 'हिंदू' कादंबरीत हिंदू धर्मव्यवस्थेमुळे अभागीपण लाभलेल्या काही व्यक्तिरेखांचे चित्रण आलेले दिसते. यामधील काही प्रमुख स्त्री व्यक्तिरेखांचा विचार याठिकाणी करावयाचा आहे.

### २.१ सारजा :

'सारजा' ही 'भिन्नलिंगी' कादंबरीतील व्यक्तिरेखा आहे. 'राम' या पँथर कार्यकर्त्याची 'सारजा' ही आई असते. ती विधवा, थकलेली, अल्सरची पेशंट आहे. तरीही घरकाम करून, शेतीतील वैरणीचा भारा करून तिने रामला वाढविलेले असते.

पतीच्या निधनानंतर सारजाने रामचा सांभाळ करून त्याला बी.ए.पर्यतचे शिक्षण दिलेले असते. बी.ए.होऊनही राम कोणतीही नोकरी, धंदा न करता चळवळीसाठी आपला वेळ खर्च करतो, त्यामुळे आर्थिक कमाई होत नाही. राम लग्न करण्यासाठी तयार होत नाही म्हणून सारजामाय रामला पँथरपासून दूर होण्यास व काहीतरी कामधंदा करण्यास विनवत असते.आजारपणातही सारजामाय काम करते, पण रामचे तिच्याकडे लक्ष नसते. तो केवळ पँथरचाच सतत विचार करीत असतो. म्हणून ती रामला बोलते "न्हवं मला कुठं तर दाव. काय तर कर. आता म्या लै दिसाची न्हैव. माझं मरण मला कळू लागलंय. तुझ्या जीवाचं काय तर बर वाईट करून घे. माझ्या डोळयापुढं तुझं चांगलं बघू दे."[३१] पण राम तिची इच्छा पूर्ण करू शकत नाही. तो ऐतखाऊ आहे म्हणून ती रामवर कधीही रागवत नाही, उलट त्याला प्रेमाने सल्ला देते. राम कमावता नाही म्हणून स्वत:च्या कमाईतील पैसे ती चहापानासाठी रामला देते. यामधून तिच्या मायाळू स्वभावाची ओळख होते.

सारजामाय कष्टाळू आहे. ती आजारी असतानाही कष्ट करते परंतु दारिद्रयामुळे तिच्यावर उपचार होवू शकले नाहीत.आजारपण वाढल्यानंतर राम तिला उपचारासाठी मुंबईला घेवून जातो. मुसळधार पावसामुळे तो दवाखान्यापर्यत पोहचू शकत नाही.वाटेतच सारजामायचा मृत्यू होतो.दारिद्रयामुळे रामला तिला दवाखान्यात नेता येत नाही.तिची कोणतीही इच्छा रामला पूर्ण करता येत नाही.'सारजा'या व्यक्तिरेखेतून लेखकाने पँथरच्या वैयक्तिक जीवनातील समस्या व संघर्षाचे चित्रण केले आहे.समाजकार्य करीत असताना घरच्या लोकांकडे कसे दुर्लक्ष होते याचे चित्रण 'भिन्नलिंगी' येते.

**२.२ सुमी ः**

'भिन्नलिंगी' कादंबरीतील ही एक अन्यायग्रस्त व्यक्तिरेखा आहे. दलितपणामुळे तरूण मुलींच्या जीवनाची कशी दयनीय स्थिती होते, याचे चित्रण या व्यक्तिरेखेमधून पहावयास मिळते. धोंडूदादा व रत्नामाय यांची एकुलती एक मुलगी सुमी असते. एक दिवस बाजार करून घरी जाताना अंधाराचा फायदा घेवून सरपंचाचा मुलगा तिच्यावर बलात्कार करतो. दलितपणामुळे गावात तिला न्याय मिळत नाही. गावात

अपमानित जिणे जगण्यापेक्षा शहरात जावून जगावे म्हणून ते शहरात येवून राहतात. सुमीला न्याय मिळण्यासाठी पँथर मोर्चा काढतात, आंदोलन करतात. पण बलात्काऱ्याला शिक्षा होत नाही. उलट सुमीचीच सर्वत्र बदनामी होते. धोंडूदादाला सुमी व रामचे लग्न व्हावे असे मनोमन वाटत असते. रामही अडचणीत त्यांना मदत करतो. रामचेही सुमीवर प्रेम असते. पण तो कधी बोलून दाखवत नाही. एकं दिवशी प्रा.कांबळे या पँथरच्या अध्यक्षाचा भाऊ 'मण्या' दारू पिऊन सुमीवर बलात्कार करण्याचा प्रयत्न करतो. त्यावेळी मांगाची मुलं त्याला मारहाण करतात. हे पाहून राम अस्वस्थ होतो. दलित नेत्याच्या भावानेच असा अत्याचार करावा या विचाराने तो संतापतो. सुमीला या शहरातही न्याय मिळू शकत नाही, इथेही तिच्या शीलाचे संरक्षण होवू शकत नाही.सुमी शहर सोडून मुंबई ला येते व पोटासाठी वेश्या व्यवसाय करते.

लेखकाने या व्यक्तिरेखेमधून दलितपणामुळे लोकांचे संसार कसे उद्ध्वस्त होतात याचे चित्रण केले आहे.जगात दलितपणाचा फायदा घेणारे अनेक आहेत. दलितांमध्येही मण्यासारखे अत्याचारी आहेत; ते गरिबीचा फायदा घेवू इच्छितात. एकूणच आजही दलितांना भोगाव्या लागणाऱ्या वेदनेचे चित्रण या व्यक्तिरेखेमधून पहावयास मिळते.

**२.३ जयश्री ः**

'भिन्नलिंगी' कादंबरीतील जयश्री ही व्यक्तिरेखा प्रा.कांबळे यांची पत्नी आहे. ही ब्राह्मण जातीतील असते.त्यांना चळवळीत कांबळेवैनी म्हणून ओळखले जाते. त्या चळवळीत सरांबरोबर काम करतात. दलितांना न्याय मिळविण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. पँथरच्या मोर्चावर ज्यावेळी लाठीहल्ला होतो त्यावेळी कांबळेवैनी पोलिसांबरोबर भांडतात. सभेमध्ये पोलिसांच्या लाठीचार्जचा धिक्कार करतात. बोरगाव खून प्रकरणात कांबळे सर पैसे घेतात हे पाहिल्यावर त्या अस्वस्थ होतात. नि:स्वार्थी पणाने दलितांसाठी काम करावे हेच त्यांचे विचार असतात.आंबेडकर पुतळ्याबरोबरच गांधींजींचाही पुतळा उभा राहवा याविषयी वाद होतो.आंबेडकर पुतळयाला विरोध होतो.तेव्हा आंबेडकरांबरोबर गांधीजीचांही पुतळा उभारावा या बाजूने वैनी मत मांडतात. पण आम्ही गांधीजींचा पुतळा उभारणार नाही असे मणू ठणकावून सांगतो.

'गांधीजींचा आदर ब्राम्हणांना असावा, आम्हाला नाही' असे बोलल्यावर वैनी रागाने राष्ट्रीय एकात्मता बैठकीमधून निघून जातात.

जातधर्म विसरून दलितांसाठी काम करीत असतानाही दलितांनी त्यांना जातीवाचक बोलावे हे वहिनींना पटत नाही. या विचारामुळे त्यांना संताप येतो. त्यामुळे काही काळ त्या चळवळीपासून दुरावतात.

नंदा गायकवाड ज्यावेळी आंबेडकर पुतळा उभारण्यासाठी आत्मदहन करते त्यावेळी त्या चळवळीत सामील होतात व आक्रमकतेने बोलतात, "जोवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा आम्हाला मिळणार नाही, तोवर आम्ही स्वस्थ बसणार नाही, नंदाचे बलिदान वाया जाऊ देणार नाही. मी स्वत: पुढील महिन्यात स्वातंञ्य दिना रोजी स्वत:ला जाळून घेईन."[३२] अशा त्यांच्या वक्तव्यावरून वातावरण गंभीर बनते. दलितांमध्ये आक्रमकपणाची भावना निर्माण होते. जयश्री (कांबळे वैनी) यांच्या व्यक्तिरेखेमधून एका ब्राम्हण स्त्रीचे पुरोगामित्त्व दिसून येते.

**२.४ नंदा गायकवाड :**

'नंदा' ही 'भिन्नलिंगी' कादंबरीतील गवई गटाचे पुढारी गायकवाड यांची मुलगी आहे. ती एस.वाय.च्या वर्गात शिकत असते. 'चेल्या' नंदावर प्रेम करीत असतो. नंदाला चळवळीविषयी आकर्षण असते. त्यामुळे ती पँथरच्या सभेला उपस्थित रहात असते. नंदा समोर असली म्हणजे चेल्याच्या भाषणात अधिक आक्रमकता येत असते. नंदा चळवळीमधील संवेदनशील कार्यकर्ती आहे. डॉ.बाबासाहेबांचा पुतळा उभारण्यास शासन विलंब करत आहे. शासनाचा निषेध म्हणून नंदा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर स्वत:ला जाळून घेऊन आत्मबलिदान करते. या बलिदानाविषयी निवेदक म्हणतो, "नंदा ऐन उभारीच्या वयातील पँथर तरूणी तिचं सर्व शरीर भाजलेलं, दलितांच्या आशाआकांक्षासारखं चळवळीतला एक उदंड उत्साह इथे जळून पडला हुता, ही आत्महत्या नव्हती. आपल्या अस्मितेसाठी दिलेलं हे बलिदान होतं."[३३] यातून पँथरची आक्रमकता, चळवळीमधील दाहकता आणि जिवंतपणाचे चित्रण येथे दिसून येते. नंदाच्या व्यक्तिरेखेतून चळवळीविषयी व डॉ.बाबासाहेबांविषयी असलेली निष्ठा व प्रेम दिसून येते.

वरीलप्रमाणे काही व्यक्तिरेखा 'भिन्नलिंगी' कादंबरीत पहावयास मिळतात. या व्यक्तिरेखांशिवाय सावतंची आई व सावंतची पत्नी सुजाता यांच्याही व्यक्तिरेखा आढळतात. तसेच वेश्या व्यवसाय करणारी सीता व झोपडपट्टीतील किराणा दुकान चालविणारी सोजी यांच्या व्यक्तिरेखा तसेच घटस्फोटित, दलित चळवळीत काम करणारी शोभा ही व्यक्तिरेखा कादंबरीत पहावयास मिळते.

'भिन्नलिंगी' प्रमाणेच लिंबाळे यांच्या 'उपल्या' कादंबरीमध्येही स्त्री व्यक्तिरेखा पहावयास मिळतात. पण 'भिन्नलिंगी' कादंबरीच्या तुलनेत या कादंबरीतील व्यक्तिरेखा कमी आहेत. त्यामधील काहीं व्यक्तिरेखांचा विचार करता येईल.

**२.५ विनया प्रधान :**

विनया प्रधान ही 'उपल्या' कादंबरीतील व्यक्तिरेखा आहे. व्यक्तिस्वातंत्र्याचा बिनधास्त आनंद लुटणारी एका सवर्ण मुलगी म्हणजे विनया. तिची ओळख होते ती, कॉलेजमधील बिनधास्त मुलगी म्हणून. ती कादंबरीत आढळते ती मुलाच्या गळयात गळा घालून बसलेली. विनया प्रधानविषयी प्रतिक्रिया देताना 'उपल्या' कादंबरीतील अनि हा तरूण म्हणतो, "विनया प्रधान लास्ट इअरला आहे, रोज एक नवा बकरा असतो तिच्याबरोबर."[३४] त्यानंतर ती कविसंमलेनात पहावयास मिळते. कविसंलेनात तिच्या कवितेच्या जादूने सर्वजन मोहित होतात. तिच्या कवितेत दारूण प्रेमभंगाचा नि:श्वास दरवळतो. तिच्या कवितेविषयी रमा बाबरलाही असूया वाटते. बिनधास्त कविवृत्तीची विनया नंतर रिपोर्टर बनते. आपल्या अंगभूत कलागुणांचा वापर करून ती धाडसी पत्रकार बनते. तिच्याविषयी माहिती देताना कार्यकर्ता विजय पगारे म्हणतो, "विनया प्रधान फ्रि लान्स जर्नालिस्ट... तिनं एकदा दोनदा साहेबांच्या मुलाखती छापल्या होत्या."[३५] विजय पगारे व विनया यांची कॉलेज जीवनापासून ओळख असते. त्यामुळे तो तिला आपल्या कामाच्या प्रस्तावाबाबत सागतो. पण विनया विजय पगारेच्या प्रस्तावास परस्परच आपला प्रस्ताव आहे असे सांगून साहेबाकडून मंजूर करून घेते व विजय पगारेला फसविते. इतर व्यक्तिरेखांपेक्षा वेगळी असलेली व्यक्तिरेखा विनयाच्या रूपाने याठिकाणी पहावयास मिळते. सवर्ण समाजातील आत्मविश्वासपूर्ण वावरणारी ही स्त्री व्यक्तिरेखा आहे.

## २.६ रमा बाबर :

रमा बाबर ही व्यक्तिरेखा दलित चळवळीत काम करणाऱ्या युवतीची आहे. 'उपल्या' व 'हिंदू' या दोन्ही कादंबरीत ही व्यक्तिरेखा सलगपणे आढळते. 'उपल्या' कादंबरीत रमा प्रथम संघर्षपूर्ण प्रसंगातच दिसून येते. महाविद्यालयातील ग्रंथपाल व रमा यांच्यात डॉ.बाबासाहेबांच्या चरित्रग्रंथावरून वाद होतो. रमा डॉ.बाबासाहेबांचे चरित्र वाचण्यासाठी मागते, पण ग्रंथपाल तीला अभ्यासाची पुस्तके वाचण्यास सांगतात. ते म्हणणात,

"अभ्यासक्रमातील पुस्तकं का वाचत नाही तुम्ही लोक?'

"मला बाबासाहेब आंबेडकरांचं चरित्र वाचायचंय......

"पण ते अभ्यासक्रमात नाही."

"बाबासाहेबांना अभ्यासक्रमात लावणं इथल्या व्यवस्थेला परवडणारं आहे?" [३६]

रमाच्या वरील वाक्यावरून व्यवस्थेविषयीचा राग व रमाची वैचारिकता दिसून येते. त्याचबरोबर आंबेडकरी विचाराविषयी असलेले तिचे आकर्षणही समजून येते. रमा कॉलेज जीवनानंतर पँथर चळवळीत सहभागी होते. चळवळीत ती पँथरच्या महिला आघाडीची अध्यक्षा बनते.त्यानंतर भूमी बळकाव आंदोलनात गावोगावी फिरून पडिक गायरान जमिनी संपादन करताना दिसून येते. या आंदोलनात त्यांना मोठया प्रमाणावर लोकांकडून प्रतिसाद मिळतो. आंदोलन यशस्वी होते, पण कालांतराने रमाचे चळवळीकडे दुर्लक्ष होते. ती दयानंदच्या लेखनावर प्रेम करते.अधिक वेळ ती दयानंदबरोबरच घालविते. दोघेही एकमेकांच्या प्रेमात बुडून जातात.त्यामुळे चळवळीकडे दुर्लक्ष होते. त्यानंतर रोहिदास मिनिस्टर झाल्यावर परत रमाही चळवळीकडे आकर्षित होते व नगरसेविका म्हणून निवडून येते. चळवळीसाठी आपला अधिक वेळ खर्च करते. रमा बाबरची अशी व्यक्तिरेखा 'उपल्या' कादंबरीत दिसून येते.

'हिंदू' कादंबरीत रमा ही चळवळीचे नेतृत्त्व करताना दिसते. कादंबरीत सुरूवातीलाच ती 'शिवशक्ती आणि भिमशक्ती' एकत्र झाली पाहिजे. या विषयावर भाषण करताना दिसून येते. तिच्या भाषणास लोकांचा प्रचंड प्रतिसाद मिळतो. ती शेवटपर्यंत चळवळीत काम करते. रमाविषयी निवेदक म्हणतो, "रमा बाबर अविवाहीत

होती. तिनं आपलं आयुष्य चळवळीला अर्पण केलं होतं... रमा बाबर सावळी असली तरी नाका डोळयानं ती आकर्षक वाटायची, ...तिचं सुशोभित राहणं, नीटनेटकं वागणं, मोकळं चाकळं बोलणं ह्यामुळे तिच्याविषयी अफवांची भरमार असायची. सद्या ती प्रा.राहूल बनसोडे ह्यांच्याबरोबर काम करत होती."[३७] रमा ही चळवळीमधील धाडसी कार्यकर्ती असून तिला चळवळीमधील कामाचा अनुभव असतो.अन्यायाविरूद्ध ती त्वेषाने पेटून उठते.त्यामुळेच तात्या कांबळेंचा खून झाल्यानंतर खुन्यांना फाशीची शिक्षा व्हावी यासाठी केलेल्या आंदोलनात ती अग्रभागी असते.

दलित बांधवांविषयी तिच्या मनात तळमळ आहे. त्यामुळे अन्यायाविरूद्ध धावून येते. सदानंद कांबळेवर हल्ला केल्याची बातमी समजताच कार्यकर्त्यांबरोबर ती अचलपूरला भेट देते. प्रा.कांबळेबरोबर संघटनाबांधणीत मदत करते.ज्यावेळी विधानसभेची निवडणूक जाहीर होते, तेव्हा प्रा.बनसोडेचा प्रचार करते. प्रा.बनसोडे निवडून येत नाहीत त्यावेळी खचून न जाता पुन्हा नव्याने चळवळीची सुरूवात करूया, संघटना अधिक मजबूत करूया अशा प्रकारे सकारात्मक विचार ती मांडते.एकूणच रमा बाबर या व्यक्तिरेखेमधून चळवळीमध्ये अनुभवसंपन्न व कणखर वैचारिक स्त्री व्यक्तिरेखेची ओळख होते.

'उपल्या' कादंबरीत याशिवाय मिलिंदची देवभोळी पत्नी लक्ष्मी तसेच माणिकचंद व गोपीचंदच्या गॅस एजन्सीत काम करणारी शैला सातपुते या व्यक्तिरेखाही दिसून येतात.

**२.७ सोनल :**

'सोनल' 'हिंदू' कादंबरीतील व्यक्तिरेखा आहे. 'सोनल' ही 'प्रभाकर कावळे'ची पत्नी असते. कॉलेजमध्ये असताना सोनल व 'तात्या कांबळे'चा मुलगा 'रोहित' यांनी स्नेहसंमलेनाच्या कार्यक्रमात एक नृत्य सदर केलेले असते. या नृत्यामुळे या दोघानांही मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळते. त्यामुळे रोहित व सोनल एकमेकांकडे आकर्षि त होतात. 'सोनल'च्या वडिलांना ही बातमी समजते. त्यामुळे ते 'प्रभाकर कावळे' बरोबर तिचे जास्त हुंडा देवून लग्न करतात. सोनलही कॉलेज जीवन विसरून प्रभाकर बरोबर संसार करते. प्रभाकर हा तात्या कावळेचा खून करतो हे दृश्य ती पाहते त्यामुळे

प्रभाकरचा ती द्वेष करून लागते. तिला कॉलेज जीवनाची आठवण होते व आपोआपच तिचे मन रोहितकडे आकर्षित होते. ती रात्र-रात्र रोहितच्या विचाराने जागून काढते. शेवटी कबीर कांबळे प्रभारकरचा खून करतो त्यावेळी ती रोहितच्या गळयात पडून आपले दु:ख प्रकट करते. अशाप्रकारचे चित्रण या व्यक्तिरेखेमधून पहावयास मिळते. या व्यक्तिरेखेमधून दलित-सवर्ण प्रेमसंबंध पहावयास मिळते तसेच दलित सवर्ण संबंधातून दोन्ही जातीत होणाऱ्या तणावाचे चित्रणही आपणास पहावयास मिळते.

**२.८ द्रोपदी :**

'हिंदू' कादंबरीतील द्रोपदी ही एक महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा आहे. लहू मांगाची बायको द्रोपदी ही गावातील रस्ते साफ करण्याचे काम करीत असते. ही परिस्थितीने दबलेली दलित व्यक्तिरेखा आहे. द्रोपदी दिसायला सुंदर असल्यामुळे गावातील विष्णू पुजारीची तिच्यावर नजर असते. एक दिवस प्रसाद देण्याच्या बहाण्याने पुजारी तिला देवळात नेतो व तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न करतो. त्यावेळी ती आरडा-ओरडा करून पळून जाते. हा डाव मनात ठेवून तो गावासमोर द्रोपदीला चेटकीन ठरवितो व गाववाल्यांना तिची नग्न धिंड काढून मारण्यास सांगतो. त्यामुळे संपूर्ण गावासमोर तिची नग्न धिंड काढून मारहाण केली जाते. याविषयी निवेदक म्हणतो, "महाभारतात द्रोपदी विवस्त्र झाली नव्हती. पण स्वतंत्र भारतात मात्र ती विवस्त्र झाली होती. कारण ती दलित होती."[३८] द्रोपदीची नग्न धिंड काढल्याची बातमी भीमनगरात समजताच कबीर कांबळे, काशीनाथ पोळके, सिद्धार्थ पगारे हे तिला वाचवितात. द्रोपदीच्या व्यक्तिरेखेमधून दलित स्त्रीच्या वास्तव परिस्थितीचे चित्रण दिसून येते. सवर्णाची दलित स्त्रीकडे पाहण्याची उपभोग्य वृत्ती दिसते.

**२.९ सविता कांबळे :**

'हिंदू' कादंबरीमधील तात्या कांबळे यांची पत्नी म्हणजे सविता कांबळे सविता ही सोशिक स्वभावाची असते. अचलपूर गावातील सवर्ण तिच्या पतीचा खून करतात, तिचे घर पेटविले जाते. स्वत:च्या सुखी-संपन्न कुटुंबाची झालेली हानी तिने पाहिलेली असते. त्यातच सोनाली व रोहित यांचे प्रेम पाहून ती अधिकच चिंतीत होते. तात्या कांबळेच्या खुनाचे साक्षीदार फुटतात त्यावेळी तिचे मानसिक संतुलन बिघडते.

तरीही वेळोवळी ती रोहितला आधार देते. अशाप्रकारे हिंदू धर्मव्यवस्थेमुळे अभागीपन लाभलेल्या एका स्त्रीची व्यक्तिरेखा येथे चित्रीत झालेली दिसते.

सोनल, रमा बाबर, सविता कांबळे, द्रोपदी या व्यक्तिरेखा 'हिंदू' कादंबरीत दिसून येतात. तसेच हेमा पंडित ही व्यक्तिरेखाही पहावयास मिळते. तिचा पती जगन्नाथ पंडित तात्या कांबळे खून प्रकरणातील आरोपी असतो. तो जेलमध्ये आत्महत्या करतो त्यामुळे गावात हेमा पंडितला विधवा जीवन व्यतीत करावे लागते. तसेच सुरेखा माने हिचाही पती खुनाच्या आरोपाखाली जलेमध्ये गेल्यामुळे घर चालविण्यासाठी तिला वेश्या व्यवसाय करावा लागतो याचेही चित्रण कादंबरीत येते. त्याचप्रमाणे रामभाऊ कांबळे याच्या दबावाखाली जीवन व्यतीत करावे लागणारी त्यांची पत्नी काशीबाई यांचेही चित्रण येते. अशाप्रकारे हिंदू धर्मव्यवस्थेमुळे दबलेल्या, पिचलेल्या स्त्री व्यक्तिरेखा 'हिंदू' कादंबरीमध्ये पहावयास मिळतात.

**समारोप :**

शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबरीतील व्यक्तिरेखांचा विचार केल्यास ह्या व्यक्तिरेखा समाजशील व दलित चळवळीतील कार्यकर्त्यांच्या असलेल्या दिसून येतात. 'भिन्नलिंगी' मधील 'राम' ही व्यक्तिरेखा चळवळीतील एक धाडसी तरूणाची आहे तर प्रा. कांबळे हे चळवळीमधील स्वार्थी प्रवृत्तीच्या नेतृत्वाचे प्रतीक आहे. सावंत ही क्रियाशील कार्यकर्त्याचे गुणदर्शन दाखविणारी व्यक्तिरेखा आहे. लिंबाळे यांनी या कादंबरीत चळवळीतील बारीकसारीक घटनांद्वारे व्यक्तिरेखांना उठावदारपणा आणलेला दिसतो. त्यामुळे सर्व व्यक्तिरेखा या जिवंत व वास्तवदर्शी जाणवतात. वास्तवातील दलित चळवळीच्या कार्यकर्त्यांच्या गुणदर्शनाचा व कर्तृत्त्वाचा आभास त्यांच्यामध्ये जाणवतो. कादंबरीमध्ये प्रत्येक व्यक्तिरेखांमध्ये असलेले गुण-दोष दाखविल्यामुळे दलित चळवळीचा वास्तव अभ्यासच मांडलेला आहे असे दिसून येते.

'उपल्या' व 'हिंदू' या कादंबरीमधील व्यक्तिरेखेद्वारेही चळवळीच्या जडण घडणीच्या घटना दिसून येतात. रोहिदास या व्यक्तिरेखेमधून एक कार्यकर्ता चळवळीमधून मंत्रीपदार्यंत पोहचतो पण त्याच्या समाजासाठी काहीही उपयोग होत नाही असे चित्रण

येते. मिलिंद, गौतम गांगुर्डे, विजय पगारे या व्यक्तिरेखामधून समाज परिवर्तनानुसार कार्यकर्त्यामध्ये वाईट बदलाची स्थिती पहावयास मिळते.

स्वार्थी कार्यकर्त्यामुळे चळवळीची कशी हानी होते त्याचे बारकाईने चित्रण शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबरीमध्ये दिसते. प्रा. बनसोडे, तात्या कांबळे व कबीर कांबळे या व्यक्तिरेखा नि:स्वार्थी, त्यागी वृत्तीच्या दिसून येतात. या तीनही व्यक्तिरेखा चिरकाल लक्षात राहण्यासारख्या आहेत. स्वाभिमानाने जगण्यासाठी नोकरी गमावून चळवळीस आपले योगदान देणारे प्रा. बनसोडे, जलस्याद्वारे लोकांचे प्रबोधन करणारे व त्यांच्यात जागृती निर्माण करणारे तात्या कांबळे आणि खून का बदला खुन अशा विचाराने निर्दोष सोडलेल्या प्रभाकरचा खुन करणारा कबीर कांबळे कादंबरीत दिसतो.

एक उच्चशिक्षित व्यक्तिमत्त्व, एक अशिक्षित तर एक अल्पशिक्षित व्यक्तिमत्त्व, हे दलितांच्या तीन पिढ्यांचे प्रतिनिधीत्व करताना दिसून येतात. तरूण पिढीचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या कबीर कांबळेच्या हिंसक कृत्याविषयी वाईट वाटते. पण त्या खुनामुळे कादंबरीच्या कथानकाला वेगळा दर्जा प्राप्त होतो. या तीनही व्यक्तिरेखांमध्ये समाजपरिवर्तनाची जाणीव आहे व अन्याविरूद्ध विद्रोह आहे. एकूणच शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबरीतील व्यक्तिरेखांमधून दलित कार्यकर्त्यांच्या विविध स्वभाव विशेषांचे व वैचारिकतेचे चित्रण पहावयास मिळते.

त्याचप्रमाणे शरणकुमार लिंबाळे यांच्या तीनही कादंबऱ्यामधून विविध नातेसंबंध जपणाऱ्या व विविध सांस्कृतिक अनुभूती देणाऱ्या स्त्री व्यक्तीरेखा पहावयास मिळतात. यामध्ये दलित परिस्थितीमुळे, दारिद्रयामुळे मृत्यू पावणाऱ्या व्यक्तिरेखा आहेत. दलितपणामुळे बलात्कारित जीवन जगणाऱ्या व वेश्या व्यवसाय स्वीकारणाऱ्या व्यक्तिरेखाही आहेत. त्याचप्रमाणे अन्यायाविरूद्ध लढणारी व स्त्री अस्तित्वाचा स्वीकार करून पुरूषी वर्चस्वाविरूद्ध बंड पुकारणारी व्यक्तिरेखाही पहावयास मिळते. हिंदू धर्म व्यवस्थेमुळे अभागीपण लाभलेल्या काही स्त्री व्यक्तिरेखाही या कादंबऱ्यांमधून दिसून येतात. अशा प्रकारे कार्यकर्त्याच्या नातेसंबंधामधील स्त्री व्यक्तिरेखामधून लेखकाने विविध सामाजिक प्रश्नाविषयीची मांडणी केलेली आहे. याचा प्रत्यय कादंबरीमधून येतो.

## संदर्भ सूची :


| | | | |
|---|---|---|---|
| १. | शरणकुमार लिंबाळे | - | 'भिन्नलिंगी' प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, पृ.९ |
| २. | तत्रैव | - | पृ.४0 |
| ३. | तत्रैव | - | पृ.६१ |
| ४. | तत्रैव | - | पृ.७0 |
| ५. | तत्रैव | - | पृ.७८ |
| ६. | तत्रैव | - | पृ.१७ |
| ७. | तत्रैव | - | पृ.२८ |
| ८. | तत्रैव | - | पृ.७८ |
| ९. | तत्रैव | - | पृ.७0 |
| १0. | तत्रैव | - | पृ.५५ |
| ११. | शरणकुमार लिंबाळे | - | 'उपल्या' दिलिपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९८, पृ.१२ |
| १२. | तत्रैव | - | पृ.११६ |
| १३. | तत्रैव | - | पृ.१२६ |
| १४. | तत्रैव | - | पृ.७0 |
| १५. | तत्रैव | - | पृ.९६ |
| १६. | तत्रैव | - | पृ.१२९ |
| १७. | शरणकुमार लिंबाळे | - | 'हिंदू' दिलिपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २00३, पृ.२५ |
| ८. | तत्रैव | - | पृ.२२ |

| | | | |
|---|---|---|---|
| १९. | तत्रैव | - | पृ.१६ |
| २०. | तत्रैव | - | पृ.१३५ |
| २१. | तत्रैव | - | पृ.१६४ |
| २२. | शरणकुमार लिंबाळे | - | 'उपल्या' उनि पृ.४२ |
| २३. | तत्रैव | - | पृ.१५९ |
| २४. | तत्रैव | - | पृ.१०१ |
| २५. | तत्रैव | - | पृ.१०६ |
| २६. | तत्रैव | - | पृ.१०२ |
| २७. | तत्रैव | - | पृ.१२० |
| २८. | शरणकुमार लिंबाळे | - | 'हिंदू' उनि पृ.१४० |
| २९. | तत्रैव | - | पृ.६० |
| ३०. | तत्रैव | - | पृ.११० |
| ३१. | शरणकुमार लिंबाळे | - | 'भिन्नलिंगी' उनि पृ.४५ |
| ३२. | तत्रैव | - | पृ.७३ |
| ३३. | तत्रैव | - | पृ.७२ |
| ३४. | शरणकुमार लिंबाळे | - | 'उपल्या' उनि पृ.२१ |
| ३५. | तत्रैव | - | पृ.१४१ |
| ३६. | तत्रैव | - | पृ.२९ |
| ३७. | शरणकुमार लिंबाळे | - | 'हिंदू' उनि पृ.११ |
| ३८. | तत्रैव | - | पृ.१५४ |